बुधवार, १७ जानेवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १५२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 17 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-152 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05



पिंगोरी, ता. पुरंदर येथे ॲक्युरेट पॉवर व इला फाउंडेशनच्या वतीने 'पिंगोरी माउंटन मिनी मॅरेथॉन' स्पर्धेला स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे (बातमी आतील पानावर)

# शिवसेना आमचीच आहे

## उद्धव ठाकरे : महापत्रकार परिषदेत दिले पुरावे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिवसेना ही आमचीच आहे, व्हीपही आमचाच असणार. शिवसेना हा माझ्या वडिलांचा पक्ष आहे. माझा पाठिंबा २०१४ आणि २०१९ ला का घेतलात? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी महापत्रकार परिषद घेत भाजपला विचारला. या पत्रकार परिषदेत त्यांनी शिवसेनेच्या घटनेचे पुरावे दाखवले. जे जे निर्णय घेतले गेले आणि ठराव झाले त्याच्या व्हिडीओ क्लिप्सही सादर केल्या.**

यावेळी अनिल परब, संजय राऊत यांनी भाषणे केली. व्हिडीओ दाखवून या सगळ्यांनी घटनेतले बदल निवडणूक आयोगाला कसे सगळे सादर केले त्याचे पुरावे सादर केले. असीम सरोदे यांनीही एक भाषण करुन निकाल किती सोपा होता आणि तो वेळ काढून कसा चुकीचा दाखवला गेला, हे पुराव्यांनिशी सांगितले. यानंतर उद्धव ठाकरेंनी भाषण करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना खुले आव्हान दिले आहे. मागच्या आठवड्यात लबाडाने जो निकाल दिला. नाही नाही लवादाने जो निकाल दिला त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात गेलो आहोत. आता सर्वोच्च न्यायालयाकडून आशा आहेतच. आज जनतेच्या न्यायालयात आम्ही आलो आहोत, असे उद्धव ठाकरेंनी म्हणाले. देशातला मतदार हा सरकार ठरवत असतो. कदाचित जगात आपला एकमेव किंवा खूप कमी देश असे आहेत ज्यांनी संविधान जनतेच्या चरणी अर्पण केलं आहे. जे काही गोष्टी समोर आणायच्या आहेत त्या आणल्या आहेत. राहुल नार्वेकर आणि मिंध्यांनी माझ्याबरोबर उभे रहावे तिथे नार्वेकरांनी सांगावे शिवसेना कुणाची. पोलीस संरक्षण न घेता जाहीर करा. मग कुणाला पुरावा, गाडावा आणि तुडवावा ते जनता ठरवेल, असे म्हणत एकनाथ शिंदे आणि राहुल नार्वेकरांना दिले आहे. राहुल नार्वेकरांना लवाद म्हणून निर्णय घ्यायला सांगितले होते. राहुल नार्वेकरांना लवाद म्हणून निर्णय घ्यायला सांगितले होते. तुमच्याबरोबर जर सगळं काही आहे, शिवसेना विकली असेल तर विकता येणार नाही हे लक्षात ठेवा. व्हीप तुमचा वगैरे आम्हाला लागू होणार नाही. व्हीपचा मराठी अर्थ चाबूक आहे. चाबूक आमच्या हातात शोभून दिसतो लाचारांच्या हातात नाही. जी काही थट्टा चाललेली आहे, ती आज तुम्ही पाहिली.

# आयटकच्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे आज आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल आहेर**

**शिऊर :** वेतनश्रेणी, पेन्शन आणि ग्रॅच्युईटी, नवीन मोबाईल या मागण्यासाठी ४ डिसेंबरपासून अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांनी संप पुकारला आहे. ४४ दिवसानंतरही संप सुरूच आहे. शासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने सरकार विरोधात अंगणवाडी सेविकांत संताप व्यक्त केला जातोय. याच कारणामुळे प्रत्येक तालुक्यात जिल्ह्यात धरणे आंदोलने केली जात आहेत. त्यातच अंगणवाडी उघडण्यासाठी सेविकेवर स्थानिक प्रशासनाच्या आधारे आणि बेकायदेशररित्या नोटिसा व्हॉट्सएपवर टाकून दबाव टाकला जात आहे, कुलूप तोडण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. अंगणवाडी सेविकेला कामावर रुजू होण्याबाबत दबाव टाकला जात असताना दुसरीकडे वर्तमानपत्राच्या माध्यमातून स्वतःहून अंगणवाडी उघडल्या जात असल्याची खोटी माहिती प्रकल्पाधिकारी देत आहेत. मात्र अशा परिस्थितीत सेविका अंगणवाडी बंद ठेऊन आहेत. सरकारला जाग येत नसल्याने शेवटी आयटकच्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. १३ जानेवारी रोजी झालेल्या आयटकच्या ऑनलाईन राज्य कौन्सिल बैठकीत बुधवारी १७ जानेवारी रोजी राज्यभर रास्ता रोको आणि जेलभरो आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर येथे क्रांतीचौक ते जिल्हा परिषदे पर्यंत मोर्चा काढण्यात येऊन जेलभरो आंदोलन करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता आंदोलनाची सुरुवात होणार असून यात जिल्ह्यातील पाच हजार आणि वैजापूर तालुक्यातील तीनशे अंगणवाडी कर्मचारी सहभागी होणार आहेत. सरकार जोपर्यंत मागण्यांचा निर्णय लेखी देत नाही तो पर्यंत आयटकच्या अंगणवाडी बालवाडी कर्मचारी युनियनच्या वतीने आंदोलने आणखी तीव्र केली जाणार आहेत. १७ जानेवारी रोजी तालुक्यातील अंगणवाडी कर्मचारी अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी क्रांती चौक येथे सकाळी १०मोठ्या संख्येने वाजता सहभागी व्हावे, असे आवाहन आय अंगणवाडी बालवाडी कर्मचारी युनियनच्या राज्यसचिव कॉम्रेड शालिनीताई पगारे यांनी केले आहे.

# रस्ते अपघात, मृत्यू कमी करण्यात चंद्रपूर जिल्हा राज्यात द्वितीय

## पोलीस अधीक्षक व प्रादेशिक परिवहन अधिकारी मुंबई येथे सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**धनंजय साखरकर**

**चंद्रपूर : सर्वोच्च न्यायालय, रस्ता सुरक्षा समितीकडून रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाण कमी करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यानुसार सन 2022-2023 च्या तुलनात्मक आकडेवारीनुसार जिल्ह्यांनी क्रमवारीनुसार उद्दिष्ट साध्य केले असून चंद्रपूर जिल्ह्याने रस्ते अपघात व त्यातील मृत्यू कमी करण्यात राज्यात द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. मुंबई शहर आणि उपनगर प्रथम तर नवी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. चंद्रपूर जिल्ह्यात सन 2022 मध्ये एकूण 840 रस्ते अपघातात एकूण 434 मृत्यू तर सन 2023 मध्ये एकूण 791 रस्ते अपघातात एकूण 349 मृत्यू झालेत. सन 2022 च्या तुलनेत 2023 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यात 49 अपघात कमी आणि 85 मृत्यू कमी करण्यात यश आले आहे. सन 2022 मध्ये मुंबई शहर आणि मुंबई उपनगरात एकूण 1 हजार 895 रस्ते अपघातात एकूण 371 मृत्यू तर सन 2023 मध्ये एकूण 1 हजार 473 रस्ते अपघातात एकूण 283 मृत्यू झालेत. तसेच सन 2022 मध्ये नवी मुंबईमध्ये एकूण 727 रस्ते अपघातात 293 मृत्यू झालेत तर सन 2023 मध्ये एकूण 755 रस्ते अपघातात एकूण 241 मृत्यू झालेत. रस्ते अपघात कमी करण्यात चंद्रपूर राज्यात द्वितीय क्रमांकावर आहे. मुंबई शहर आणि उपनगर प्रथम तर नवी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. जिल्ह्याने रस्ते अपघात कमी करण्यासाठी जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या माध्यमातून विविध उपायोजना राबवून जिल्ह्यामधील रस्ते अपघात कमी केले आहेत. व नागरिकांनी सुद्धा वाहतूक नियमांचे पालन केल्याने चंद्रपूर जिल्ह्याला हा सन्मान मिळाला आहे, ही उल्लेखनीय बाब आहे.**




**अपघातावर नियंत्रणासाठी उपाययोजना :** सन 2022 मध्ये घडलेल्या रोड अपघाताचे रोड प्रकार, अपघाताच्या वेळा, अपघाताचे कारण पोलीस ठाणे याप्रमाणे घडलेल्या अपघाताचे विश्लेषण करण्यात आले . विश्लेषणावरून अपघातामध्ये पहाटे 4 ते 8 वाजेच्या दरम्यान रोड अपघाताची संख्या अधिक प्रमाणात असून धोकादायक ड्रायव्हिंग तसेच भरधाव वेगाने वाहन चालविणे यावर नियंत्रण करण्यासाठी सन 2023 मध्ये मोटार वाहन कायद्यांतर्गत दारू पिऊन वाहन चालविणे, विना सिटबेल्ट आणि विना हेल्मेट वाहन चालविणे ही त्रिसूत्री मोहीम संपूर्ण जिल्ह्यात माहे डिसेंबर 2022 पासून राबविण्यात आली . चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सन 2022 मध्ये विना सीटबेल्ट वाहन चालविणाऱ्या 9 हजार 258 वाहन चालकांवर कारवाई तर विना हेल्मेट वाहन चालविणाऱ्या 14 हजार 390 व्यक्तींवर कारवाई करण्यात आली . सन 2023 मध्ये विना सीटबेल्ट वाहन चालविणाऱ्या 20 हजार 715 वाहन चालकांवर तर विना हेल्मेट वाहन चालविणाऱ्या 35 हजार 721 व्यक्तींवर मोटर वाहन कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्यात आली . चंद्रपूर जिल्ह्यात पोलीस ठाणे व वाहतूक नियंत्रण शाखेकडून त्रिसूत्री मोहीम सातत्याने राबविण्यात आली .

**मोटर वाहन कायद्यातंर्गत कार्यवाही :** मोटर वाहन कायदा कलम 185 प्रमाणे केलेल्या कार्यवाहीत 2 हजार 373 प्रकरणात 2 कोटी 25 लक्ष 30 हजार इतका दंड आकारण्यात आला . रोडवर धोकादायक स्थितीत वाहन उभे करून ठेवणाऱ्या वाहन संदर्भात सन 2023 मध्ये एकूण 2 हजार 643 वाहनांवर कलम 283 भां .द .वी .प्रमाणे तसेच भरधाव वेगाने वाहन चालविणाऱ्या 117 वाहन चालकांविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करण्यात आली .

**हा जिल्हा प्रशासनाचा सन्मान : किरण मोरे :** सन 2023 मध्ये जिल्हाधिकारी विनय गौडा व पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनामध्ये सर्व समिती सदस्यनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केले असून हा संपूर्ण चंद्रपूर जिल्हा प्रशासनाचा सन्मान आहे, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांनी म्हटले आहे .जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी रस्ता सुरक्षा या विषयाला विशेष महत्व व वेळ दिला . प्रसंगी कठोर भूमिका घेऊन सर्व कार्यकारी अधिकारी यांच्याकडून काम करून घेतले . त्यामुळेच जिल्ह्यात अपघातमृत्यू प्रमाण कमी झाले आहे . सन 2024 मध्ये सुद्धा चंद्रपूर जिल्ह्यातील अपघात कमी होण्यासाठी अधिक चांगले काम करू, असे श्री मोरे यांनी म्हटले आहे .

**आरटीओ व वाहतूक शाखेची संयुक्त मोहीम :** यामध्ये अल्पवयीन चालकांवर कार्यवाही करून प्रत्यक्ष त्यांच्या पालकांना पाचारण करून त्यांना समुपदेशन करण्यात आले . भरधावपणे बुलेट चालविणाऱ्या युवकांविरुद्ध स्वतंत्र मोहीम राबवून प्रभावी कार्यवाही करण्यात आली . यामध्ये एकूण 81 बुलेट वाहने जप्त करण्यात आली . कर्कश आवाज करणारे वापरात असलेले सायलेन्सरचा नाश करण्यात आला . **व्यापक जनजागृती :** जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण शाळा, कॉलेज येथे भेटी देऊन वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती करण्यात आली . वाहतूक शाखेमार्फत जिल्ह्यातील विविध ट्रान्सपोर्ट कंपन्यांमध्ये जाऊन वाहन चालकांना रस्ते सुरक्षाविषयी मार्गदर्शन करण्यात आले . एनजीओ/वाहतूक शाखा/आरटीओ यांच्या संयुक्त माध्यमातून राज्य महामार्गावरील वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले .




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# ते चाळीस दिवस. ..

१ मे २०२३ चा दिवस. आपण सगळे महाराष्ट्रातील लोक महाराष्ट्र दिन साजरा करत असताना कोलंबिया देशातील अमेझॉनच्या जंगलात एक महाभयंकर घटना घडत होती. कधी कधी सत्य हे कल्पनेपेक्षाही भयंकर आणि अद्भुत असतं . एखाद्या चित्रपटाचा विषय व्हावा अशी ही हकीगत. कोलंबिया देशातील सेस्ना २०६ हे छोटंसं खाजगी विमान एका छोट्या गावातील काही लोकांना घेऊन सॅन जोस डेल ग्वावियारे या शहराकडे निघालं होतं. या विमानात त्या विमानाच्या वैमानिकासह एकूण सात जण प्रवास करत होते. एक स्थानिक नेता होता. एक आई तिच्या चार लहान मुलांना  सुरक्षित ठिकाणी घेऊन जाण्यासाठी निघाली होती. अमेझॉनच्या जंगलातील हितोतो या आदिवासी जमातीतील हे सगळे रहिवासी होते. तेथील सशस्त्र टोळ्यांच्या दहशतीपासून सुटका करून घेण्यासाठी त्यांना आपलं गाव सोडणं भाग पडलं होतं. पण हायरे दैवा ! सुरक्षिततेच्या शोधात जाणाऱ्या या निष्पाप जीवांचं विमानच असुरक्षित झालं. विमानानं साधारणपणे ३५० किमी चा पल्ला पार केला असेल नसेल तोच विमानाच्या इंजिनात काहीतरी बिघाड आहे याची वैमानिकाला जाणीव झाली. आता आपल्या सगळ्यांच्या जीवाला धोका आहे हे त्यानं विमानातील सगळ्यांना सांगून टाकलं. थोड्याच वेळात त्या विमानाचा रेडिओ संपर्क तुटला. पुढच्या काही क्षणातच भयानक आवाज करीत ते विमान अमेझॉनच्या घनदाट जंगलात कोसळलं. हे विमान एका झाडावर कोसळलं आणि झाडावरच अडकून पडलं. या दुर्दैवी अपघातात वैमानिक आणि  त्या विमानात असलेला स्थानिक नेता मृत्युमुखी पडले. आपल्या आईसोबत प्रवास करीत असलेल्या त्या छोट्या चार मुलांची जीवनरेखा मात्र बळकट होती. या भयानक अपघातातून ते छोटे जीव आश्चर्यकारकरित्या बचावले. **क्रमशः**





## आनंदी पहाट

## संभ्रम दूर करण्यासाठी समुपदेशन आवश्यक

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यातील गेलेल्या क्षणांना आपण कितीही ठरवले तरीही विसरू शकत नाही. त्या गतकाळातील आठवणीचा प्रत्येक क्षण आपल्याला काहीवेळा नवी उभारी देत असतो, तर काहीवेळा नैराश्यात देखील घेऊन जात असतो. भूतकाळात घडलेल्या प्रत्येक घटनेचा, घडामोडीचा संबंध आपण आपल्या वर्तमानातील जीवनाशी जोडण्याचा केविलवाणा प्रयत्न नेहमीच करत असतो. जो गेला तो भूतकाळ होता, त्यांत किती गुरफटून राहायचे, ह्याचे कित्येकवेळा आपल्याला भानच रहात नाही. तो काळ आपण कितीही ठरवला, तरीही विसरूच शकत नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

खरे म्हणजे भूतकाळात रममाण होण्यापेक्षा वर्तमानातील परिस्थितुसार भविष्य उज्वल करण्याचा आपण प्रामुख्याने आणि प्राधान्याने विचार केला पाहिजे. आपण अनेकदा भूतकाळातून अंतर्मनाने बाहेर पडत नाही आणि वर्तमानातील आनंद मिळवू शकत नाही, केवळ आपल्या नशिबाला आणि भविष्याला दोष देत बसतो. अशा परिस्थितीत अनेक फुकटचे मार्गदर्शन करणारे भेटतात. प्रत्येकाचे भिन्न विचार, निरनिराळी मते, काही प्रमाणांत आग्रही भूमिका, पण ह्यामुळे मात्र अनेकजण चक्रावून जातात. व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यांत काहीजणांमध्ये संस्कृतीचे तर काही जणांमध्ये विकृतीचे दर्शन देखील घडते. त्यामुळे तर व्यक्ती अधिकच हतबल होऊ लागतात, विमनस्क अवस्थेतील पहिला टप्पा गाठायला लागतात. अनेकांच्या सल्ल्यांमुळे त्यांच्या मनांत संभ्रम निर्माण होत जातो. त्यांची स्वतःची वैचारिक बैठक बिघडते; विचार, वर्तन आणि व्यवहारांत नकारात्मकता वाढत जाते. अशावेळेला मानसशास्त्रीय समुपदेशकाचा सल्ला मोलाचा ठरतो, हे अगदी नेमक्या वेळेत माहिती होणे आवश्यक असते. समुपदेशनासाठी काही वेळ आणि थोडे पैसे खर्च केल्यानंतर मात्र त्यांच्या जीवनातील अत्यंत महत्वाचा निर्णय ते घेऊ शकतात. एकूणच कालांतराने त्यांच्या लक्षांत येते कि, आयुष्याचे भविष्य वैचारिक प्रगल्भतेत असते. अनेकदा समुपदेशन करवून घेण्याचा विचार अनेकजण करत नाहीत.




आधुनिक केसरी

## श्वास हरि नित्य | सूर व्हावा ||

सूर आळवावा | भक्तीने हरिचा ||
सक्तीने कुणाचा | भाट नको ||१||
सज्जन-दुर्जन | जाणावे सोंगाडे ||
अनुभवे कोडे | सोडवावे ||२||
ज्याची त्याची झोळी | प्रारब्धे भरते ||
भोगोनी सरते | भोग सारे ||३||
जाण माझ्या जीवा | अंती एक सत्य ||
श्वास हरि नित्य | सूर व्हावा ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

ऐसे आवर्षण आलें ।तेणें घरचि बुडालें ।
पुढें देसीं सुभिक्ष जालें ।आतिशयेंसी ॥११॥
लेकुरां नाहीं वाढवितें ।अन्न करावें लागे आपुलेन हातें ।
बहु त्रास घेतला चित्तें ।स्वयंपाकाचा ॥१२॥
लोकीं भरीस घातलें ।पुन्हां मागुतें लग्न केलें ।
द्रव्य होतें तें वेचलें ।लग्नाकारणें ॥१३॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

धीर ज्ञान विज्ञान में, शिल सन्तोष असंग ।
दया क्षमा वेशन रहित, अन्तर प्रेम अभंग ।।१६।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल नवम अध्याय) ०४/०९/१६
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
विरक्त संत धैर्य, ज्ञान, वैराग्य, शील, संतोष, त्याग, दया आणि क्षमा सहीत सर्व सद्गुणांनी युक्त असतात. ते सर्व व्यसनांपासून रहित होऊन पूर्ण आत्मिक प्रेमाने भक्तीत लवलीन असतात.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सर्व वाचक मित्रांना मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा. तिळगुळ घ्या गोडगोड बोला
सर्व कटू अनुभव विसरायचे ,व मनाला आनंद व ऊमेद देणारे सण समारंभ उत्सव साजरे करायचे हा तर आपला सनातन भारतीय धर्म आहे. निसंदेहनिरूपण या समासातून समर्थ आपल्याला भारतीय संस्कृती चीच आठवण करून देत आहेत. मनुष्य जन्माला आलो आहोत तेव्हा वाट्याला आलेले जे जे विहित कर्म आहे ते करा पण ते करून नंतर अलिप्त रहा. ज्ञानी पुरूषांची लक्षणे समजून घ्या व ती आत्मसात करा. रामायण महाभारताच्या काळापासून अनेक पिढ्या जन्मल्या व याच्या पुढेही अनेक पिढ्या निर्माण झाल्या व नंतरही होत राहिल्या. ही जगरहाटी अव्याहत पणे चालू आहे. त्यात दोन प्रकारच्या व्यक्ती पहायला मिळतात.

# आपण भगवंताचे झालो तरच सुखी होऊ

आधुनिक केसरी

आपल्याला साधायचे काय हे ध्यानात धरले पाहिजे. परमात्मा साधायचा आहे, आणि शरीर आणि प्रपंच ही साधने आहेत, हे पक्के समजावे. आपण साधनाला साध्य आणि साध्याला साधन मानतो, म्हणून आपले चुकते. एका गृहस्थाला मुलाबाळांसह मुंबईला जायचे होते. आता आगगाडीत बसायला मिळेल या आनंदात मुले गाडीत बसली, पण मुंबईस जाण्यासाठी गृहस्थ गाडीत बसला. गाडीतून उतरताना मुलांना वाईट वाटले, त्या गृहस्थाला नाही तसे वाटले.
वसिष्ठांनी रामाला सांगितले की, “ रामा, तू प्रपंचात वागताना अंतर्यामी निःसंग रहा. ” ‘ मी देह नसून आनंदरूप आत्मा आहे, निःसंग आहे, ’ ही दृढ भावना ठेवून प्रपंच करावा. जमीन सोडून कुणाला राहाता येत नाही, त्याप्रमाणे प्रपंच कुणालाच टाकता येत नाही. पण त्यात ‘राम कर्ता’ मानून वागणारा तो पारमार्थिक, ‘ मी कर्ता ’ असे मानून वागणारा तो प्रापंचिक. ‘ मी कर्ता ’ असे म्हणूनही जर प्रपंच दुःखरूप राहतो, सुखरूप होत नाही, तर



त्याचा कर्ता मी नाही हे सिद्धच झाले ! प्रपंच हा अर्धवटच आहे, पूर्ण फक्त राम आहे. मिठाचे पोते कितीही धुतले तरी त्याचा खारटपणा जात नाही, तसे प्रपंचाचे आहे. म्हणून परमार्थ हे ध्येय ठेवून सुलभ असे साधन जे नामस्मरण, ते अखंड करावे. प्रपंचात आपण किती कष्ट करतो ! तितका मोबदला मिळत नाही, तरीही कष्ट करतो. परमार्थात तसे नाही. परमार्थ जितकाजितका करावा तितकेतितके समाधान अधिकाधिक असते. आयुष्यभर प्रपंच केला तर मृत्युसमयीही प्रपंचच आठवेल. म्हणून प्रपंचाचा हव्यास धरू नये. प्रपंचातल्या वस्तू आज ना उद्या जाणार हे जाणून, त्यांच्याबाबत अलिप्तपणाने वागावे. ही वृत्ती अभ्यासाने आणि वारंवार विचाराने वाढवावी. प्रपंचात, प्राप्त झाले त्याचा हर्ष न करावा, गेल्याचा शोक न करावा. देह प्रारब्धावर टाकावा. हे साधायला एक मोठी परिणामकारक आणि सोपी युक्ती आहे : आपण रामाचे व्हावे. राम ठेवील तसे समाधानाने राहावे. हे सर्व विश्व आणि अखिल प्रपंच ईश्वराचा आहे; तो ज्याचा त्याला देऊन टाकून मोकळे व्हावे.
सर्व ईश्वराचे आहे, माझे काही नाही, असे समजणे म्हणजे ईश्वरार्पण करणे आहे. आपण भगवंताचे झालो तर सुखी होऊ, नाहीतर दुःखी होऊ. धान्यातले दगड, माती, पाकड, निवडून बाजूला काढून, धान्य जे सार, ते घ्यावे; त्याचप्रमाणे, अहंकाराचे खडे, ममत्वाची माती आणि विकारांचे पाकड, आत्मस्वरूप परमार्थात मिसळल्याने दुःखरूप प्रपंच होतो. ते प्रपंचातून निवडून टाकले म्हणजे जे उरेल ते सारे सुखच !
**२१३. 'रामा, सर्व तुझेच आहे, तू देशील ते घेईन.' अशी भावना ठेवावी. यानेच अत्यंत समाधान होते.**

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

गोरक्षानेंगुरूच्या बोलण्याचा तो झोंक पाहिला, तेव्हा आजपर्यंत सुवर्णाची वीट कोणत्या कारणास्तव जपून ठेविली होती ते मला सांगावे, असा त्यानें आग्रह धरिला. तेव्हा मच्छिंद्रनाथ म्हणाला की, माझ्या मनात अशी इच्छा होती की, आपल्या देशी गेल्यावर साधुसंतांची पूजा करून एक मोठी समाराधना घालावी. ते ऐकून तुमचा हा हेतु मी पुरवितो, म्हणून गोरक्षाने त्यास सांगितले. मग गोरक्षाने गंधर्वास्त्रमंत्र म्हणून भस्माची एक चिमटी स्वर्गाकडे फेकली; त्याबरोबर चित्रसेन गंधर्व येऊन नाथास वंदन करून काय आज्ञा आहे म्हणून विचारू लागला. तेव्हा गोरक्षाने सांगितले की, आणखी काही गंधर्वांस बोलाव आणि त्यांना चौफेर पाठवून बैरागी, संन्यासी, जपी, तपी, संतसाधु, देव, गंधर्व, दानव किन्नर या सर्वांस येथे आणावे. कां की, आम्हांस एक टोलेजंग जेवणावळ घालावयाची आहे. मग चित्रसेनाने शंभर गंधर्व आणून जिकडे तिकडे पाठविले. ते गंधर्व पुष्कळांस आमंत्रण करून त्यांस घेऊन आले. नवनाथ, शुक्राचार्य, दत्तात्रेय, याज्ञवल्क्य, वसिष्ठ, वामदेव, कपिल, व्यास, पराशर, नारद, वाल्मीकि, आदिकरून मुनिगण तेथे थोडक्याच वेळां येऊन पोहोचले. नंतर गोरक्षनाथाने मच्छिंद्रनाथास सांगितले की, भोजनसमारंभास पुष्कळ मंडळी जमली आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १७ जानेवारी २०२४
adhunikkesari.com Adhunik Kesari

# लोणंद नगरपंचायतमध्ये भ्रष्टाचाराचा कळस

## काही ग्रामस्थांकडून 'त्या' कामकाजावर आक्षेप

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच कुंपण कामास सुरुवात करण्यात आल्याने तसेच ३ गुंठे जागेमध्ये कुंपण करण्यासाठी नगरपंचायत निधी अंतर्गत १ लाख ६९ हजार इतका खर्च देण्यात आल्याने हा खर्च एवढा आवश्यक आहे का? असे प्रश्नचिन्ह या कामकाजाच्या खर्चाबाबत काही ग्रामस्थांकडून उपस्थित करण्यात आलेले आहेत. शिवाय लोणंद नगरपंचायतीकडुन हे कामकाज बेकायदेशीर रित्या केले जात आहे.सरकारी जागेमध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याआधी कुंपण घालण्यास परवानगी कशी काय दिली? असा सवाल सुद्धा उपस्थित करण्यात आलेला असून लोणंद नगरपंचायत मध्ये भ्रष्टाचाराचा कळस चालू आहे. असा आरोप सुद्धा एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे करण्यात आलेला आहे.

प्रसिध्दी पत्रकात असे म्हटलेले आहे की,दिनांक १३ जानेवारी २०२४ रोजी लोणंद नगरपंचायत ने गणपती मंदिरासमोरील मोकळ्या जागेत तारेचे कुंपण करण्यासाठीची १,६९,१०१/- रुपयाची जाहीर निविदा सुचना काढली होती.या सूचनेमध्ये सदर निविदा ही दिनांक १६ जानेवारी २०२४ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत भरावयाची मुदत दिली गेलेली आहे. परंतु सदर तारेच्या कुंपणाच्या कामाला दिनांक १४ जानेवारी २०२४ रोजी खड्डे काढणे व दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी लोखंडी खांब काँक्रीट ओतून उभे करणे, इत्यादी कामे निविदेची पूर्ण मुदत संपण्याआधी पूर्ण केलेली आहेत.याशिवाय या जागेमध्ये सँड क्रश व खडी दिसून येत आहे. या संदर्भामध्ये निविदेची मुदत संपण्याआधीच एका विशिष्ट कंत्राटदारास काम दिल्याचे निष्पन्न होत आहे.यामध्ये काही आर्थिक हेराफेरी झालेली आहे काय? याचा खुलासा संबंधित सन्माननीय लोकप्रतिनिधी व माननीय नगरपंचायत प्रशासन यांनी करावा. असा सवाल लोणंदमधील काही ग्रामस्थांनी उपस्थित केलेला आहे.

पुढे असेही म्हटलेले आहे की,सदरची जागा जर सरकारची असल्यास माननीय प्रशासनाने सरकारी जागेमध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याआधी कुंपण घालण्यास परवानगी कशी काय दिली? या गैर कायदेशीर कृत्यांमध्ये प्रशासनातील कोण कोण अधिकारी सामील आहेत.याचा खुलासा लोणंदच्या जनतेसमोर करण्यात यावा.निविदा प्रक्रिया कायदेशीररित्या पूर्ण होण्याआधी सदर कुंपण करण्याची घाई का करण्यात आली? याचा खुलासा देखील संबंधित सन्माननीय लोकप्रतिनिधी व माननीय नगरपंचायत प्रशासन यांनी करावा.अंदाजे ३ गुंठे जागेमध्ये कुंपण करण्यासाठी १ लाख ६९ हजार रुपयांचा खर्च नगरपंचायत फंडातून केला जातोय.हे अनाकलनीय आहे.लोणंद नगरपंचायत मध्ये भ्रष्टाचाराचा कळस चालू आहे.लोणंदच्या सुजाण नागरिकांनी लोणंद नगर पंचायतच्या कारभारावर जाणीवपूर्वक लक्ष ठेवणे लोणंदच्या उज्वल भविष्यासाठी अत्यंत गरजेचे आहे.असे आवाहन लोणंद विकास मंच चे अध्यक्ष राजेंद्र डोईफोडे, नगरसेवक प्रवीण व्हावळ, निलेश शेळके पाटील, खंडाळा तालुका माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष म्हस्कु आण्णा शेळके पाटील, शकील भाई इनामदार,विशाल जाधव,नितीन धायगुडे पाटील यांनी केले आहे.



**असाच प्रकार हा लोणंद मधील इतर विकास कामांच्या बाबतीत घडत तर नसेल ना? :** निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याच्या अगोदरच कामकाजास सुरुवात करण्यात आल्याने या कामकाज प्रश्नी ग्रामस्थांकडून संतप्त भावना व्यक्त केल्या जात आहेत .जर असं करायचेच होते तर मग निविदा कुणासाठी काढली होती? असा सवाल विचारला जात आहे .निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच कामकाजास सुरुवात करण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने नगरपंचायत प्रशासनाकडून भोंगळ कारभार सुरू चालला असल्याचे म्हटले जाऊ लागले आहे .लोणंद शहरात विविध विकास कामे येत असतात .केली जात असतात .ज्या पद्धतीने या कुंपण काम काजाबाबत घडत आहे .असाच प्रकार हा लोणंद मधील इतर विकास कामांच्या बाबतीत घडत तर नसेल ना? असा संशय सुद्धा आता नागरिक घेऊ लागलेले आहेत .



# ऐश्वर्याच्या कथक नृत्याने जिंकली मने

## 'नृत्य साधना' कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** शेंदुर्णी -कथ्थक या शास्त्रीय नृत्यकलेच्या आस्वाद रसिकांना घेता यावा यासाठी "नृत्य साधना "सादरीकरणाचा कार्यक्रम येथील ऐश्वर्या साने आणि तिच्या पुणे येथील सहकारी नृत्य कलाकारांनी अत्यंत बहारदारपणे सादर केला. या सुंदर व मनोहारी कार्यक्रमाने रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळविला. शेंदूर्णी येथील सुप्रसिद्ध ह्दय रोग तज्ञ कै. डॉ . चारुदत्त साने व कौमुदी साने यांची कन्या ऐश्वर्या हिने आपले कथ्थक नृत्याचे शिक्षण ललित कला विद्यापीठ व भारती विद्यापीठ पुणे येथे घेतले . गुरु तेजस्वीनी साठे यांच्या मार्गदर्शनाखाली कथ्थक पूर्ण केले . फॉन्स , जर्मनी , बेल्जीयम , ऑस्ट्रेलिया , नेदरलॅन्ड , येथेही कथ्थकचे सादरीकरण केले . ७५ व्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वंदे भारत अभियान मध्ये सहभाग राष्ट्रपती , प्रंतप्रधान यांच्या समोर दिल्ली येथे सादरीकरण केले .आपल्या जन्मगावी शास्त्रीय नृत्य रसिकांना कथ्थक नृत्यकलेचा आस्वाद घेता यावा यासाठी साने परिवाराच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी मान्यवरांच्या व गावकर्यांच्या वतीने ऐश्वर्या साने थत्ते हिचा सत्कार करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ऐश्वर्या साने हिने कृष्ण स्तृती ने केला . नंतर मयसभेतील द्रोपदी सादर केली . प्रेक्षकांनी याला भरभरून दाद दिली .त्यानंतर ऐश्वर्या साने- थत्ते ,रिना लेले, कु. ईशा ओझा व अरूंधती अभ्यंकर या सर्व कलाकारांनी ताल बंसत , बदरीया नंतर मल्हार जाम या फ्युजनने कार्य कार्यक्रमाची सांगता झाली .

कार्यक्रमाचे उद्घाटन जामनेरच्या नगराध्यक्षा साधना महाजन होत्या. अध्यक्षस्थानी बेटी बचाव बेटी पढाओचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र फडके होते. भाजपाचे जेष्ठ नेते गोविंद अग्रवाल, शेंदुर्णी नगरपंचायतच्या नगराध्यक्षा विजयाताई खलसे, अमृत बापू खलसे, चंदा अग्रवाल, शकुंतला काकू गरुड, सतीशचंद्रजी काशीद व उज्वला काशीद, प्राजक्ता गरुड, राजेंद्र भारुडे , निलेश थोरात, विनीत जोशी आदी मान्यवर उपस्थितीत होते. असेच बहारदार आणि दर्जेदार कार्यक्रम शेंदुर्णी नगरीत वारंवार व्हावेत अशी अपेक्षा अध्यक्षांनी व गावकऱ्यांनी व्यक्त केली. कडाक्याच्या थंडीतही डोळ्यांना खिळवून ठेवणारे नृत्य सादर केल्या मुळे शेवट पर्यत हजारो रसिकांनी मनसोक्त आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जान्हवी सूर्यवंशी व मीरा इंगळे यांनी केले. तर आभार डॉ कल्पक साने यांनी मानले.

# आपची निवडणूकपूर्व आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** मंगळवार रोजी आम आदमी पक्षाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे आम आदमी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा निवडणूक प्रचार प्रमुख श्री रंगा दादा राचूरे यांच्या अध्यक्षतेखाली व महिला प्रदेशाध्यक्ष सिमाताई गुट्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवडणूक पूर्व आढावा बैठक आयोजित केली आहे.

या बैठकीत लोकसभा, विधानसभा महानगरपालिका आणि जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या स्थानिक स्वराज्य



संस्थांच्या निवडणूक लढवण्याबाबतचा आढावा पक्षाच्या वतीने घेण्यात येणार आहे. तरी इच्छुक उमेदवार लोकप्रतिनिधी आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांनी या बैठकीस बुधवार दिनांक 17 जानेवारी 2024 रोजी दुपारी 4:30 वा. राहुल कल्चरल हाल , काळा गणपती समोर , एन-5 ,सिडको छत्रपती संभाजीनगर येथे उपस्थित राहावे असे आवाहन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुभाष निकम व शहराध्यक्ष इम्रान शेख उस्मान यांनी केले आहे.



# पैठण येथे 30 जानेवारी रोजी पक्षी महोत्सवाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान, पैठण आयोजित एन्व्हायरमेंटल रिसर्च फाउंडेशन अँड एज्युकेशन अकॅडमीच्या दहाव्या पक्षी महोत्सवाचे आयोजन 30 जानेवारी 2024, मंगळवार रोजी पैठणला होत आहे. पैठणला जागतिक दर्जाचे जायकवाडी पक्षी अभयारण्य आहे. जगभरातून येथे विविध पक्षी या जलाशयाच्या परिसरात येतात. या पक्ष्याब्राबत शास्त्रीय माहिती उपलब्ध व्हावी, जागरुकता वाढावी, स्थानिकांचा सहभाग वाढावा यासाठी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ज्येष्ठ पक्षीमित्र, पर्यावरण तज्ज्ञ, इन्व्हायरमेंट रिसर्च फाउंडेशन अँड एज्युकेशनल अकादमीचे अध्यक्ष डॉ. दिलीप यार्दी, आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूलचे संस्थापक प्रा. संतोष तांबे, देवेंद्र इनामदार, विरंगुळा संस्थेचे सचिव प्रा. संतोष गव्हाणे, पक्षीमित्र दिलीप भगत, कुणाल विभांडिक, विजय ठाणगे आदींनी ही माहिती दिली. या महोत्सवानिमित्त विविध शाळांमध्ये दृकश्राव्य माध्यमातून पक्ष्यांच्या दुनियेची ओळख संवादात्मक व्याख्यानातून करुन दिली जाईल. जायकवाडी पक्षी अभयारण्यातील पक्षी निरीक्षण, छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शन, पक्षीमित्रांशी मुक्त संवाद, प्रश्नोत्तरे आदी भरगच्च कार्यक्रम शुक्रवार, (दि.19) रोजी पासून जायकवाडी परिसरातील शाळांमध्ये होतील.

महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ खगोशास्त्रज्ञ श्रीनिवास औंधकर यांच्या हस्ते संपन्न होणार आहे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहन नाईकवाडे, विभागीय वन अधिकारी ( वन्यजीव ) हे असतील . प्रमुख पाहुणे म्हणून पैठणचे उप जिल्हाधिकारी श्री सोहम वायळ हे असतील . समारोपाचे प्रमुख पाहुण्या म्हणून जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) तर समारोप सत्राच्या अध्यक्ष डॉ . छाया महाजन या असतील . चित्र दालनाचे उद्घाटन पक्षीमित्र दिलीप भगत यांच्या हस्ते संपन्न होईल .

# भुजबळांची पतंगबाजी

आधुनिक केसरी

गेल्या निवडणुकांमध्ये अनेक लोक आपल्या विरोधात उभे राहिले होते. येवल्याच्या जनतेने मात्र त्यांचा दोर कापला. आगामी निवडणुकीत ज्यांची इच्छा आहे. त्यांनी विरोधात लढावे. त्यांचा पतंग जनतेच्या बळावर नक्कीच कापू, असा दावा राज्याचे अन्न, नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी केला. मकरसंक्रांतीच्या निमित्ताने येवला येथे आयोजित पतंगोत्सवात भुजबळ यांनी सहभाग घेतला. यावेळी त्यांनी पतंग उडविण्याचा आनंद लुटला. नागरिकांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. आकाशात झेपावणारे पतंग हे अधिक उंचावर गेले पाहिजेत. हे सर्व आपल्याच लोकांचे पतंग आहेत. हे पतंग कापण्याचा प्रश्नच येत नाही. मात्र येणाऱ्या निवडणुकीत आपल्या समोर जे विरोधक असतील, त्यांचा पतंग या मतदारसंघातील जनतेच्या बळावर नक्कीच कापला जाईल, असे त्यांनी नमूद केले. येणाऱ्या निवडणुकीत ज्यांची इच्छा आहे. त्यांनी विरोधात लढावे. मतदारसंघातील जनता त्यांना घरचा रस्ता दाखवेल. जनतेच्या विश्वासाचा धागा पक्का असल्याने माझा धागा कायम राहणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मकर संक्रातीच्या निमित्ताने येवला येथील कार्यालयात मंत्री भुजबळ यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना तिळगुळ वाटप करीत मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी चित्रकार संतोष राऊळ यांनी मंत्री भुजबळ यांना त्यांचे चित्र रेखाटलेला पतंग भेट दिला. यावेळी ज्येष्ठ नेते अंबादास बनकर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राधाकिसन सोनवणे, विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, तालुकाध्यक्ष साहेबराव मढवई आदी उपस्थित होते. पतंगबाजी करणाऱ्यांचे गाव अशी ओळख असणाऱ्या येवल्यात पारंपरिक हलगीच्या वाद्यावर ताल धरत हा उत्सव साजरा होत आहे. पतंगोत्सव आणि रंगपंचमी हे येवल्याचे आकर्षण. येवल्यातील पतंगोत्सव तीन दिवस चालतो. बाहेरगावी असणारे या काळात येवल्यात दाखल होऊन पतंगोत्सवाचा मनमुराद आनंद घेतात. येवल्यातील पतंग कमी वाऱ्यात उडतात. कारण त्यात वजनाने हलक्या काड्या वापरल्या जातात. या काळात मोठ्या आकारातील वेगवेगळ्या प्रकारच्या पतंगी उडविण्याचे कौशल्य अनेकांकडून दाखवले गेले. यात पुरुषांच्या बरोबरीने महिला, युवतींचा सहभाग लक्षणीय असतो. घर व इमारतींच्या गच्चीवर फाफडा, जिलेबी, वडापाव, मिठाई अशा वेगवेगळ्या खाद्य पदार्थांवर ताव मारला गेला.

# गुरु गोविंदसिंह

आधुनिक केसरी



पंकज वसंत पाटील
मो. 9850430579

**हाती शस्त्र घेऊन धर्माचे रक्षण केल्याचा दुर्मिळ इतिहास रचणाऱ्या गुरु गोविंदसिंह या शिखांच्या दहाव्या गुरूंना भारतात संतसैनिक म्हणून ओळखले जाते. गुरु तेगबहादूर हे त्यांचे वडील व गुजरी त्यांची माता. सातव्या वर्षापासूनच त्यांनी कित्येक भाषांचे अध्ययन करून थोड्याच दिवसात कित्येक पौराणिक ग्रंथ आत्मसात केले. गोविंदसिंह यांचे वडील गुरू तेगबहादूर यांनी हिंदूंच्या बळजबरी मुस्लीम धर्मांतराला विरोध केल्यामुळे गुरूतेगबहादूर यांची औरंगजेबाने हत्या केली होती. देश-धर्म, संस्कृति और जीवन मूल्यांच्या रक्षणासाठी सर्वस्व बलिदान करणाऱ्या शिखांच्या नववे गुरू, गुरू तेगबहादुर सिंहजी यांच्या हत्येमुळे वयाच्या ९ व्या वर्षी शिखांचे गुरूपद त्यांचे पुत्र गुरु गोविंदसिंह यांच्याकडे आले.**

गुरुगोविंद सिहांना राष्ट्रीयत्व या एकाच ध्येयाने प्रेरित झालेला सुसंगत, एकरशी व एकजन्सी असा समाज निर्माण करायचा होता, त्याच गोष्टीला त्यांनी प्राधान्य दिले. त्यासाठी त्यांनी धर्मदीक्षेचा एक नवाच प्रकार सुरू केला. खंडेदामृत म्हणजेच तलवारीच्या धारेचे पाणी हे त्याचे नाव होय. ही दीक्षा घेतलेल्या शिखांना खालसा म्हणजेच परमेश्वराचे खास शिष्य असे नाव देऊन त्या सर्वांना सिंह हे उपनाम व पंच ककार धारण करायला लावले. केस, कंगवा, कच्छ, लोखंडी कडे आणि कृपाण हे त्यांचे पंचक ककार होय.

गोविंद सिंह यांच्या शिष्यापैकी काही लोक त्यांना ईश्वराचा अवतार मानत. ही गोष्ट शीख धर्माच्या विरुद्ध होती म्हणून गोविंद सिहांनी स्पष्ट शब्दात या प्रवृत्तीचा निषेध केला.

**जो हमको परमेसर ऊचऱ्हे । त सब नरकुंड मे पऱ्हे।। मा को दास तवानका जानो । यामे भेदना रंच पछानो ।। मै हौ परम पुरखो को दासा । देखन आयो जगत तमाशा ।।**

अर्थात मला जे परमेश्वर म्हणतील ते सगळे नरककुंडात पडतील मला परमेश्वराचा दासच समजा व यात कुठलाही संशय बाळगू नका. मी प्रभुचा केवळ दासच असून, या जगाचा खेळ पाहण्यासाठी आलेलो आहे.


खालसापंथात सत्य आणि शुद्धता यांच्या जोडीने शौर्यालाही मानाचे स्थान दिले आहे. यामुळे खालसा लोक कर्तव्यकठोर बनले. समाजाच्या खालच्या थरातले लोकही गोविंदसिंह यांच्या प्रेरणेने कडवे युद्धे बनले. त्यांनी गोविंद सिंग यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या मोगल सत्तेविरुद्ध १४ लढाया लढून दाखवल्या. त्यातील १२ लढायात त्यांनी बादशाही सेनेचा पराभव केला. खालसा पंथाची निर्मिती करण्यात स्वार्थशून्य व अभिनव असे राष्ट्र एक राष्ट्र उभे करणे, हा गोविंदासिंहांचा उद्देश्य होता. परंतु त्यासाठी शिवलिंग पहाडातील हिंदू राजे व दिल्लीश्वर मोगल यांनी त्यांना कडाडून प्रतिरोध केला. मोगलांच्या अफाट शत्रूबळाशी गोविंदसिंग यांचा मुकाबला सुरू होता. बाराव्या लढाईनंतर त्यांना आनंदपुर हे ठिकाण सोडून सतलज नदी पार करून दक्षिणेत माळव्यात उतरावे लागले. चारही पुत्रांनी देशासाठी आणि धर्मासाठी बलिदान दिले. इसवी सन १७०८ मध्ये महिन्यात नांदेड येथे त्यांचा मुक्काम असताना ७ ऑक्टोबरला सरहिंद नबाबाच्या एका हस्तकाने अचानक हल्ला करून गोविंद सिंह यांना ठार मारले.

जोरदार व ओघवती लेखनपद्धती असलेले गोविंदसिंह हे अष्टपैलू विद्वान होते. कमरेला तलवार लटकावून, हाताशी धनुष्यबाण तयार ठेवून, आपल्या सैनिकांना रणादेश देत असताना रणभूमीवरच ते काव्य रचीत असत. उत्तर हिंदुस्थानात त्यावेळी चालू असलेल्या फारशी,पंजाबी व ब्रज या तिन्ही भाषेत ते काव्य करीत असत.

एकेश्वरी मताचा सिद्धांत आणि श्रद्धा यांचे प्रतिपादन करणारी व परमेश्वराच्या स्तुतीची अनेक कवणे त्यांनी लिहिली आहेत. त्यांनी बरेच धार्मिक वाङ्मय अनुवादितही केले आहे. 'विचित्र नाटक' नामक आत्मचरित्रही त्यांनी लिहिले आहे. 'दशम ग्रंथ' या नावाचे मोठे वाङ्मय आहे. करतार व करीम, मंदिर आणि मस्जिद, पूजा व नमाज यातील फरक केवळ बाह्य असून या सर्वांची आंतरिक धारणा एकच आहे हे त्यांच्या खालील पद्यावरून सहज समजून येते.

**देहरा मसीद सोई, पूजा औ नमाज ओई। मानव सबै एक, पै अनेक को भ्रमाऊ है । देवता अदेव जच्छ गंधर्व तुरक हिंदू । न्यारे न्यारे देसन के भेस को प्रभाउ है । एकै नैम, एकै कान एकै देह एकै बान । खाक बाद आतश औ आब कौ रलाउ है । अलख अभेस सोई पुराण औ कुरान ओई। एकही सरूप सबै एक ही बनाऊ है ।।** जे मंदिर तीच मशिद होय पूजा म्हणजेच नमाज होय. मन हे सर्वत्र एकच आहे, पण त्यावरील संस्कार मात्र भिन्न आहेत. देव, राक्षस, यक्ष, गंधर्व मुसलमान व हिंदू हे वरवर निरनिराळे असले तरी त्यांच्या देशातील वेषाचा तो परिणाम आहे. सर्वांचे नयन, सर्वांचे कान, सर्वांचे देह सर्वांची वाणी हे सर्व एकच आहेत. पृथ्वी, वायू, अग्नी, जल इत्यादी पंचमहाभूतांचा हा मेळ आहे जो हिंदूंचा अलक्ष तोच मुसलमानांचा अभेरव आहे. जे पुराण तेच कुराण आहे. सर्वांचे स्वरूप एकच असून सर्व निर्मिती एकच आहे हा या रचनेचा अर्थ आहे.

शिखांचे गुरू असण्यासोबतच गुरु गोविंदसिंह हे नितीपरायण नेता, कुशल कवी, साहसी वीर होते. त्यांनी अनेक चौपाई, दोहे रचल्या. त्यांचा दुर्गा सप्तशतीचा अनुवाद असलेला चंडी चरित्र नामक ग्रंथही प्रसिद्ध आहे. त्यांनी शिखांमध्ये राजकीय जागृती निर्माण केली. राष्ट्रीयत्वाच्या दृढ बंधनाने शिखांना एकत्र बांधत सामान्य शेतकरी कामगार वर्गातून स्वधर्म व स्वदेश यांच्यासाठी सर्वस्व अर्पण करण्याच्या अगणित वीरांची परंपरा गोविंदसिंहांनी निर्माण केली. गुरू गोविंदसिंहांच्या चरणी शतशः वंदन.



# नायलॉन मांजा ठरतोय फास

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**'चढा ओढीत चढवीत होते.. बाई मी पतंग उडवीत होते..'आई मी पतंग उडवीत होते. ही लावणी ऐकताना आपण मंत्रमुक्त होतो मात्र हाच मंत्रमुक्तपणा मुक्या पक्षांच्या प्राण्यांच्या तसेच मनुष्याच्या गळ्याचा फास होतो, याचा विचार कोणीच करताना दिसत नाही प्रत्यक्षात पतंग उडविण्याचा आनंद साध्या मांज्याने घ्यावा असे असतानाही सर्व विभागांच्या नाकावर टिच्चून चिनी नायलॉन मांजाची खुलेआम विक्री होत आहे. यातूनच पक्षी तसेच वाहन चालक जखमी होत असल्याच्या घटना घडत आहेत.नायलॉनच्या मांजामुळे गळा कापल्याने दर वर्षी लोक गंभीर जखमी होतात; तर शेकडो पक्ष्यांचा मृत्यू होतो आहे. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (एनजीटी) नायलॉन मांजावर चार वर्षांपूर्वीच बंदी घातली आहे.**

औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशांमध्ये पुन्हा एकदा नायलॉन मांजांवरील बंदी कायम केली आहे. मात्र, संक्रात जवळ आल्याने सर्व आदेश धाब्यावर बसवून उत्पादकांकडून नायलॉन मांजाचा पुरवठा आणि विक्रीही सुरू झाली आहे. नागरिकांनी सिंथेटक आणि नायलॉन मांजाची खरेदी करू नये, असे आवाहन पक्षीप्रेमींनी केले आहे.मात्र सर्व नियम व न्यायालयीन आदेश पायदडी तुडवून खुलेआम नायलॉन मांजा ची विक्री होत आहे.

मागील काही वर्षात पतंगोत्सवात पारंपरिक मांजाऐवजी नायलॉन व काचेचा वापर करून तयार केलेल्या प्रतिबंधित मांजाचा वापर वाढला आहे. या प्रतिबंधित मांजाची विक्री काही जणांकडून छुप्या पध्दतीने केली जात असल्याचे यापूर्वी आढळून आले आहे. पतंग उडवताना घर्षणाने मांजा तुटतो. इमारती, तारा, झाडे, व रस्त्यांवर अडकतो. अशा तुटलेल्या मांजामुळे पक्षी, प्राणी व मानवी जिवितास धोका निर्माण होऊन नागरिकांसह पक्षी, प्राणी यांचे जखमी होण्याचे अथवा मृत्यू होण्याच्या घटना घडल्या आहेत. अशा मांजामुळे शाळकरी मुले व दुचाकीस्वारांचा अपघात होऊन जखमी अथवा मृत्यू झाले आहेत. तुटलेला मांजा विजेच्या तारांमध्ये अडकून काही ठिकाणी आगीही लागतात. नायलॉन मांजाचे विघटन होत नसल्याने कित्येक दिवस तो झाडे आणि तारांमध्ये तसाच अडकून असतो. पक्ष्यांसाठी तो जिवघेणा ठरतो.

या मांजाच्या वापरावर बंदी असूनही छुप्या पद्धतीनं त्याची सर्रास विक्री होत असते. आता चिनी मांज्यानं गळा कापल्यानं लष्करी जवानाचा मृत्यू झाला आहे. ही धक्कादायक घटना हैदराबाद येथे घडली आहे. नायक के कोटेश्वर रेड्डी ( २९ वर्ष ) असं मृत जवानाचं नाव आहे. रेड्डी हे गोवळकोंडा येथील लष्करी रूग्णालयात शनिवारी (१३ जानेवारी) कामासाठी दुचाकीवरून जात होते. तेव्हा, हैदराबादमधील लंगर हौजे उड्डाणपूल येथे चिनी मांजा त्यांच्या गळ्यात अडकल्यानं ते दुचाकीवरून खाली पडले. यात मांज्यामुळे गळा कापल्यानं रेड्डी यांना गंभीर दुखापत झाली. दुचाकीवर असलेले सहकारी शंकर गौड यांनी रेड्डी यांना रूग्णालयात दाखल केलं. पण, खूप रक्तस्त्राव झाल्यानं रेड्डी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

केवळ लहान मुलेच नव्हे तर सर्वांनाच वर्षानुवर्षे पतंगबाजीची आवड आहे. पूर्वीच्या काळी मांजा रसापासून तयार केला जात असे. मात्र गेल्या काही वर्षांत चायनीज मांजा बाजारात आला आहे. या मांजामुळे अपघात होत असल्याने चायनीज मांजाच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. तरीही, विक्री जोरात सुरू आहे. त्यामुळे कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

पूर्वीच्या काळी तांदूळ किंवा तांदळापासून साधा धागा घेऊन मांजा बनवला जात होता, ज्या धाग्यावर बारीक तुटलेली काच लावली जायची, ज्याचा उपयोग दोन पतंग उडवण्यासाठी केला जात असे, मात्र गेल्या काही वर्षांत चायनीज मांजाची लोकप्रियता वाढली आहे. आता पतंगबाजीसाठी मांजा बनवणे बंद झाले आहे. फक्त चायनीज मांजा धावू लागला आहे त्यामुळे रस्त्यावरील अपघातात मांजामुळे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. गेल्या काही वर्षांपासून हा चायनीज मांजा नायलॉन धाग्यात येऊ लागला आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# विद्युत देयकासाठी मागितली भीक

## क्रीडा संकुलाचा विद्युत पुरवठा केला होता खंडित

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बल्लारपूर तालुका क्रीडा संकुलनाचे लाखो रुपयांचे विदयुत देयक थकले होते. वेळेवर देयकाची भरणा न केल्यामूळे महावितरण कंपनीने सोमवारला वीज पुरवठा खंडित केला होता. स्पर्धेसाठी करोडो रुपये खर्च केल्या गेलेत मात्र काही लाखाचं देयक भरण्यासाठी प्रशासनाकडे निधी नव्हता. देयकाचा रक्कमेसाठी भूमिपुत्र ब्रिगेट या सामाजिक संघटनेने आज सकाळी जिल्हा क्रीडा संकुलनं बाहेर उभेराहून मैदानावर येणाऱ्या नागरीकांकडून भीक मागत पैसे गोळा करत प्रशासनाच लक्ष वेधल. जमा झालेली रक्कम क्रीडा अधिकाऱ्याच्या सुपूर्द करण्यात येणार आहे. जिल्हातील बल्हारपूर तालुका क्रीडा संकुलात 67 वी राष्ट्रीय मैदानी क्रीडा



स्पर्धा पार पडली होती. या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आले होते. सोहळ्याच्या भव्यदिव्यताची थेट मुख्यमंत्री शिंदे यांनी कौतुक केलं होतं, ही स्पर्धा आटोपून पंधरा दिवस झालेत. स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात मोठ्या प्रमाणात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. 2 लाख 9 हजार 100 रुपयाचे विदयुत देयक थकीत होते. देयकाची भरणा न केल्याने सोमवारला क्रीडा संकुलनाचा विदयुत पुरवठा खंडित करण्यात आला होता. स्पर्धेसाठी करोडो रुपये खर्च करणाऱ्या चंद्रपूर जिल्हा प्रशासनाकडे विद्युत बिल भरण्यासाठी दोन लाख रुपये नव्हते काय ? असे प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. दरम्यान विद्युत देयक भरण्यासाठी भूमिपुत्र ब्रिगेडने आज जनतेकडून भीक मागितली.भूमिपुत्र ब्रिगेडची ही कृती प्रशासनाला झोंबणारी ठरली. जमा झालेली रक्कम क्रीडा अधिकाऱ्याकडे सुप्रीत करण्यात येणार असल्याचे भूमिपुत्र ब्रिगेड च्या कार्यकर्त्यांकडून सांगण्यात आले.

# जंगी शंकरपटाचा आज शेवटचा दिवस

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** राज्याचे पणन व अल्पसंख्याक विकास मंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून तसेच सिल्लोड नगर परिषद आयोजित सिल्लोड महोत्सव अंतर्गत तीन दिवसीय भव्य राज्यस्तरीय शंकरपट स्पर्धे चे उद्घाटन ना. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपत्र झाले. या स्पर्धेत अभूतपूर्व उत्साहात आणि थरारक अश्या या बैलगाडी शर्यती पार पडल्या, सिल्लोड शहरातील भराडी रोडवरील सुतगिरणी मैदान येथे सोमवार दि. १५, पासून शंकरपट ( बैलगाडा शर्यतीचा थरार पहायला मिळाला आहे.आज शेवटचा दिवसाचा लाभ घ्यावा असे आवाहन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे. सदरील शंकरपट हा तीन दिवसीय शंकरपट आहे. सामान्य गटात प्रथम विजेत्या बैलजोडी मालकास होंडा युनिकोर्ण मोटर सायकल, द्वितीय विजेत्यास होंडा शाईन, तृतीय विजेत्यास ५१ हजार रुपये रोख, बौथा क्रमांक विजेत्यास ४९ हजार तर स्थानिक गटात प्रथम विजेत्यास होंडा शाईन मोटर सायकल यासोबतच सामान्य गटात क्रमांक ५ ते २० पर्यंत १६ विजेते तर स्थानिक गटातील द्वितीय क्रमांक ते १० पर्यंत ९ पर्यंत असे एकूण ३० गुणानुक्रमे विजेत्यास जवळपास २ लाख ५० हजार रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार आहे.



# इंदिराबाई ललवाणी विद्यालयात महाराष्ट्र क्रीडा दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** आज दि.१५ जाने. महान कुस्तीपटू ऑलिम्पिक पदक प्राप्त स्वर्गीय खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त जामनेरपुरा येथील इंदिराबाई ललवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र क्रीडा दिन साजरा करण्यात आला. सुरुवातीस महान कुस्तीपटू ऑलम्पिक पदक प्राप्त स्व.खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण उपप्राचार्य प्रा.के एन.मराठे यांच्या हस्ते करण्यात आले, याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक प्रा. डी.झेड.गायकवाड, प्रा.विजय पाटील, गजानन कचरे, प्रा.सोनूसिंग पाटील, प्रा.जे.आर. पाटील,प्रा.सौ.मनीषा घडेकर, प्रा.कोमलसिंग परिहार, प्रा.सतीश क्षीरसागर, प्रा.माधुरी तायडे आदी. शिक्षक बंधू-भगिनी तथा विद्यार्थी वर्ग,खेळाडू उपस्थिती होते.

आजचा दिवस राज्य क्रीडा दिन म्हणून का साजरा केला जातो याविषयी माहिती तसेच स्वर्गीय खाशाबा जाधव यांच्या क्रीडा कारकीर्द याविषयी माहिती क्रीडा शिक्षक प्रा. समीर घोडेस्वार यांनी विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक एस आर चव्हाण, क्रीडा विभाग प्रमुख जी सी पाटील यांचे मार्गदर्शन लाभले तर आयोजन क्रीडा शिक्षक गजानन कचरे, प्रा.समीर घोडेस्वार यांनी केले.

# नागठाणा ते जुमडा रस्ता कामासाठी आंदोलन!

## सुमार दर्जाच्या साहित्याचा वापर

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**वाशीम :** तालुक्यातील नागठाणा ते जुमडा या रस्त्याचे प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सध्या काम केल्या जात आहे. मात्र, सदरील काम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे आज (दि.१५)भुमिपुत्र शेतकरी संघटने चे युवक जिल्हा अध्यक्ष सचिन काकडे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ सचिव राम इढोळे व भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्यावतीने जुमडा फाटा आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. वाशीम तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ५१ वरील नागठाणा ते जुमडा जिल्हा सिमेपर्यंत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत रस्त्याच्या दर्जोन्नतीचे ९.१९ कि.मी. काम सुरू आहे. मात्र, सदरील काम हे संबंधित कंत्राटदारामार्फत अंदाजपत्रकानुसार होत नसल्याचा आरोप स्थानिकांमधून होत आहे. याबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ सचिव राम इडोळे तसेच सचिन काकडे युवक जिल्हा अध्यक्ष भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडे तक्रारी करण्यात आल्या. या तक्रारींची दखल घेत आज स्थानिक नागरीकांसह जुमडा फाटा येथे रास्ता रोको आंदोलन



करण्यात आले. यापूर्वी देखील या रस्ताकामाच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडे तक्रारी आल्या होत्या. मात्र, तेव्हा संबंधित कंत्राटदाराने रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे करणार असल्याचे तोंडी आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर लगेच थातूर-मातूर पद्धतीने काम करण्यास सुरुवात केली. त्यामुळे स्थानिक नागरीकांनी आज जुमडा फाटा येथे रास्तारोको आंदोलन केले. तसेच सदरील रस्त्याच्या कामाची वरिष्ठांकडून चौकशी करण्यात यावी, सदरील काम मंजूर अंदाजपत्रकानुसार दर्जेदार करावे, अशी मागणी यावेळी आंदोलन कर्त्यांनी केली.

**तर अल्पावधीतच रस्ता खराब होणार :** नागठाणा ते जुमडा या रस्त्याचे सध्या सुरू असलेले काम हे अतिशय सुमार दर्जाचे काम होत आहे . त्यामुळे वरिष्ठांनी संबंधित कंत्राटदाराच्या कामाची सखोल चौकशी करून मंजूर अंदाजपत्रकानुसार काम करावे, अन्यथा हा रस्ता अल्पावधीतच खराब होणार असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी आंदोलन कर्त्यांनी दिल्या .

**तोंडी आश्वासन हवेत विरले :** या रस्त्याचे काम सुमार दर्जाचे होत असल्याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर भुमिपुत्र शेतकरी संघटने चे युवक जिल्हा अध्यक्ष सचिन काकडे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ सचिव राम इढोळे यांनी कंत्राटदारांकडे विचारणा केली . यावेळी त्यांनी चांगल्या दर्जाचे काम करण्याचे आश्वासन दिले . मात्र, हे तोंडी आश्वासन अल्पावधीतच हवेत विरल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटना व भूमिपुत्र संघटनेच्यावतीने शेतकरी, नागरिकांच्या हितासाठी आंदोलन करावे लागल्याची प्रतिक्रिया उमटली .





# उद्योजक हा जन्माला येत नसतो तो आपल्यातूनच घडत असतो : राजेश मिश्रा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मोठमोठ्या उद्योगांची सुरुवात ही लहानातल्या लहान उद्योगापासून सुरू होत असते. तुमची आजूबाजूची परिस्थिती ओळखण्याच सामर्थ्य आणि तुमच्या मध्ये असलेली चिकाटी हीच उद्या जाऊन एका मोठ्या उद्योगाची निर्मिती असते. कारण उद्योजक हा जन्माला यावा लागत नाही. तर, तो आपल्या मधूनच घडत असतो. असे प्रतिपादन मिटकॉन कन्सल्टन्सीचे असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट राजेश मिश्रा यांनी येथे व्यक्त केले. मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजीनियरिंग सर्व्हिसेस लिमिटेड पुणे द्वारा आयोजित आणि उद्योग संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई द्वारा प्रायोजित भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी आणि युवतींसाठी आयोजित निवासी उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मिटकॉनचे असिस्टंट व्हॉइस प्रेसिडेंट राजेश मिश्रा यांच्यासह जिल्हा उद्योग केंद्र , चंद्रपूर चे महाव्यवस्था करमाटे साहेब तथा व्यवस्थापक मेश्राम साहेब, मिटकॉन चंद्रपूरचे चीफ ट्रेनर संतोष लंके आणि मोटिव्हेशनल ट्रेनर प्राध्यापक शाम हेडाऊ यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना राजेश मिश्रा यांनी सामान्य परिस्थितीवर मात करून मोठा उद्योजक म्हणून आपल्याला नावारूपाला येता येतं. परंतु त्यासाठी आपल्यामध्ये काहीतरी वेगळेपण असावं लागतं .आणि , हे वेगळेपण अशा ट्रेनिंग प्रोग्रामच्या माध्यमातून तुम्हाला देण्यात येतं . 18 दिवस चालणाऱ्या या ट्रेनिंग प्रोग्राम मध्ये आपण विविध विषयांवर ट्रेनिंग घेणार आहोत, मार्गदर्शन घेणार आहोत . यातून तुमची विचारशक्ती बदलेल आणि तुम्ही उद्योजकतेच्या दिशेने वाटचाल चालू करू शकाल असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक करमाडे यांनी जिल्हा उद्योग केंद्र द्वारे घेण्यात येणाऱ्या विविध उद्योग विषयक कार्यक्रमाबाबत माहिती दिली. मोटिव्हेशनल ट्रेनर प्रा. शाम हेडाऊ यांनी 18 दिवसीय निवासी कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी पूर्ण एकाग्र चित्ताने हे ट्रेनिंग केल्यास या ट्रेनिंगचा तुमच्या आयुष्यात एक वेगळा प्रभाव दिसून येईल. आणि नोकरी मागण्यापेक्षा तुम्ही नोकरी देणारे व्हाल. यासाठी तुम्ही तुमची विचार करण्याची पद्धत बदलणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त केले. सूत्रसंचालन चंद्रपूरचे चीफ ट्रेनर संतोष लंके यांनी केले तर आभार गुणवंत वाटेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम समन्वयक स्मिता पेरके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# महागावकरांच्या एकजुटीचा पहिला टप्पा पूर्ण

## आज मंगल कार्यालयाचे लोकार्पण

आधुनिक केसरी

**वसंत खडसे**

**वाशिम :** वाशिम जिल्हयातील रिसोड तालुक्यात येत असलेले महागाव हे जवळपास साडे चार ते पाच हजार लोकसंख्येचे गाव आहे. सामाजिक कार्यात नित्यानेच येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी संपूर्ण गावकऱ्यांनी एकजुटीने कंबर कसली अन..पाहता, पाहता गावाजवळच पडून असलेल्या चार एकर ओसाड जागेवर सामाजिक कार्यासाठी एक सर्वसुविधायुक्त असे मंगल कार्यालय आणि उर्वरित जागेवर मनमोहक अशी सुंदर वाटिका निर्माण करण्याचा गावकऱ्यांनी एकजुटीने संकल्प केला होता. आज त्यातील पहिल्या टप्प्यातील फलश्रुती पुर्ण होत आहे. सुमारे २०हजार स्क्वेअर फूट क्षेत्रफळ असलेल्या जागेवर अंदाजे एक कोटी २५ लाख रुपये लोकवर्गणीतून खर्च करत भव्यदिव्य असे मंगल कार्यालय उभे केले आहे. त्याचा गावासह,परिसरातील लोकांना देखील लाभ व्हावा, या उद्देशाने संत महात्म्यांच्या साक्षीने व परिसरातील हजारो लोकांच्या उपस्थितीत आज लोकार्पण सोहळा पार पडत आहे.

' गाव करी, ते राव ना करी ' या जुन्या म्हणीचा प्रत्यय तर महागावच्या ग्रामस्थांनी दिलाच, परंतु गावानं स्वयंनिर्भर होण्यासाठी नेमकं काय करायला हवं..! याचं एक आदर्श उदाहरण म्हणून महागावचं देता येईल ! वाशिम जिल्हयातील शेवटच्या टोकावर बुलढाणा जिल्ह्याच्या सरहद्दीवर



वसलेले हे गाव आहे. येथील गावकऱ्यांनी गावातली सर्व राजकीय मतभेद, गट, तट,विसरून लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांचे होईल तेव्हढे सहकार्य घेण्याचा सामोपचाराने योग्य निर्णय घेतला आणि त्या निर्णयाची यशस्वी फलश्रुती करुन घेतली हेच या गावातील नागरिकांचे विशेष वैशिष्ठ ठरते. गावातील सुमारे ९० टक्के लोकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे आपसूकच येथील ग्रामस्थांनी आपली शेती केंद्रित अर्थव्यवस्थाही मजबूत करीत विकासाचा रस्ता पकडला आहे. गावकऱ्यांची धडपडी वृत्ती, एकजुटीचे निर्णय,जिद्द आणि उत्साह याचा सुरेख मिलाफ साधून आज महागाववाशी इतरांसाठी एक नवा आदर्श निर्माण करीत आहेत. याचं ताज उदाहरण म्हणजे आज भव्य अशा मंगल कार्यालयाचे लोकार्पण होत आहे. एक अडचण अनेक अडचणीतून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवते फक्त, तो अवलंबला गेला पाहिजे, याचा प्रत्यय या गावातील नागरिकांनी दिला आहे. नित्यनेमाने यणारे सामूहिक कार्य, लग्नसराईत होणारे समारंभ असो वा इतर सुख दुःखाचे कार्यक्रम असोत. त्यात बदलत्या नैसर्गीक वातावरणामुळे आज खुप मोठया समस्या निर्माण होत आहेत. लग्नकार्यात लाखो रुपये खर्च करून पाहुण्यांसाठी केलेली सरबराई ऐन वेळेवर वादळ वाऱ्याने उध्वस्त केल्याचे येथील अबाल वृद्धांनी अनेक वेळा अनुभवले आहे. त्यावर उपाययोजना करण्यासाठी आणि सामूहिक कार्यासाठी आपले गाव स्वयंनिर्भर करण्याची संकल्पना येथील ग्रामस्थांना सुचली आहे.त्याअनुषंगाने " एकच ध्यास, गावाचा विकास " हा गावातील वडीलधाऱ्या जेष्ठ मंडळींचा मंत्र गावातील सर्व तरुणाईने मनावर घेतला आणि सर्वजण एकजुटीने कामाला लागले.पाहता, पाहता अवघ्या सहा महिन्यात तब्बल ९० लाख रुपये लोकवर्गणीतून खर्च करत २० हजार स्क्वेअर फुटांचे भव्य मंगल कार्यालय उभे केले आहे. त्याचा आज मोठ्या थाटामाटात लोकार्पण होत आहे. शिवाय सभोवतालच्या परिसरात साकारत असलेल्या गजानन महाराज वाटिकेचे काम सुद्धा प्रगतीपथावर आहे.

**गोपालेश्वर महाराज गावाचे ग्रामदैवत** :शेकडो वर्षांपूर्वी गावावर ओढवणाऱ्या अनेक संकटांचा उद्धार येथे अचानक प्रगट झालेल्या संत गोपालेश्वर महाराज यांनी केला आहे . त्यामुळे गावातील सर्व जाती, धर्माच्या लोकांची महाराजांवर आघाध श्रद्धा आहे . गावाचे ग्रामदैवत म्हणून गोपालेश्वर संस्थानचे कार्य सुद्धा आज प्रगतीपथावर आहे . येथे दरवर्षी हरिनाम सप्ताह व यात्रेचे आयोजन करण्यात येते . गुरुदेव आश्रम पळसखेड( सपकाळ ) येथील वेदांताचार्य गुरुदेव स्वामी हरिचैतन्य महाराज यांच्या प्रेरणेतून तेथे आध्यात्मिक केन्द्र सुरु आहे .तर पूज्यपाद स्वामी विश्वानंद गिरिजी महाराज यांच्या मार्गदर्शनात गोपालेश्वर संस्थान, संत गजानन महाराज संस्थान, मंगल कार्यालय आणि वाटिका आदी विविध विकास कामे झपाट्याने प्रगती करत आहेत .

**काय केले ग्रामस्थांनी** : आमच्या गावाने केवळ सामूहिक कार्यातील वादळी वाऱ्याचीच समस्या अनुभवलेली नाही ..!




तर पैनगंगा नदीच्या तीरावर असल्यामूळे अनेक वेळा महापुराच्या संकटांचा सुद्धा सामना केला आहे . अशा नैसर्गीक संकटांचा मुकाबला करण्यासाठी पूज्यपाद स्वामी विश्वानंद गिरिजी महाराज यांचा सिंहाचा वाटा आहे .त्यांनी गाव स्वयंनिर्भर करण्याचा गावकऱ्यांचा एकजुटीचा निर्णय योग्य मानून स्वत : जवळून आर्थिक सहाय्य सुद्धा केले आहे . अनुभवी व जेष्ठ मंडळींचा हा निर्णय गावातील सर्व तरुणांनी सुद्धा तेव्हढ्याच तन, मन, धनाने मनावर घेतल्यामुळेच गावाची प्रत्येक कार्यात यशस्वी वाटचाल सुरू आहे . आज लोकार्पण होत असलेले मंगल कार्यालय केवळ गावकऱ्यांसाठीच नव्हे ; तर परिसरातील गाव खेड्यातील लोकांसाठी सुद्धा माफक दरात उपलब्ध राहणार आहे . याचे सर्व श्रेय ग्रामस्थ आणि प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्यांना सुद्धा आहे ..!

**प्रा .डिगांबर मवाळ, ( सेवानिवृत्त प्राचार्य,महागाव ता .रिसोड )**

# सांगा पाहू कोण देईल आमच्याकडे ध्यान

आधुनिक केसरी

**काही वर्षांपूर्वी विजय फंगाळ या तरुणाने पालावरील मुलांवर एक शॉर्ट फिल्म बनवली होती. शिक्षणापासून वंचित असलेल्या या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी एका शिक्षकाची धडपड असा त्याचा हेतू होता. कुठलाही चित्रपट, शॉर्ट फिल्म बनवायची असली की,तो सतत माझ्याशी संपर्क ठेवून असतो या निमित्ताने त्याने त्याची संकल्पना सांगितली आणि त्याला मी तातडीने नाव सुचविले भ...भटकंतीचा. तुम्ही आम्ही शाळेत अ, अननसाचा, ब..बदकाचा शिकलो.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

मात्र भटकंती करणाऱ्या च्या आयुष्यात कधी भ भडजी चा आला नाही उभं आयुष्य ज्यांची भटकंतीमध्ये चालले त्यांच्या आयुष्यात भ..भटकंतीचा च असणार आणि ते शीर्षक चांगलेच गाजले. आज पुन्हा हा विषय आठवण्याला कारण ही तसेच घडले. दरवर्षीप्रमाणे राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या जन्मोत्सवाला जाऊन घरी परतलो. डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयात भटकंती करणाऱ्या मुलीचा वाढदिवस साजरा करायचा असल्याने मला मित्रवर्य रफिक कुरेशी यांनी बोलावले.

खरं म्हणजे जिजाऊ सृष्टीवर वृत्तांकनाच्या निमित्ताने इकडे तिकडे फिरावे लागल्याने आणखी कुठे जावं अशी अजिबात इच्छा नसतांना भटकंती करणाऱ्या मुलीचा वाढदिवस साजरा केल्या जातोय म्हटल्यावर मी कुठलाही कंटाळा न करता वाचनालयात गेलो.

ना रहायला घर,ना जन्मदात्याची साथ. व्यसनाच्या आहेरी गेलेल्या पतीपासून वेगळं राहत त्या चिमुकली ची आई मिस्त्री च्या हाताखाली काम करणारी मजूर, खुल्या मैदानात कापडी पाल टाकून रात्रभर कुठलीही भीती न बाळगता झोपणारे हे कुटुंब ,बाजूला पत्रकारिता करणारे रफिक कुरेशी या सद्गृहस्थाचे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने असलेले सार्वजनिक वाचनालय.

दिवाळी च्या सणाला रफिक कुरेशी त्यांना मिठाई देतो,फटाके देतो आणि दरवर्षी वंचितांची दिवाळी गोड करतो.याच माध्यमातून रफीक कुरेशी यांचा संपर्क फाटकं आयुष्य असलेल्या ह्या कुटुंबाशी आला.त्या माध्यमातून पालावरची तीन बहीण भाऊ खळेगाव येथे ज्ञानगंगा प्राथमिक आश्रमिय विद्या मंदिर ह्या ऍड साहेबराव सरदार यांच्या



शाळेत शिकतात. याच शाळेवर शिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्या प्रवीण गायकवाड यांची नजर ह्या चिमुकल्यांवर पडली. आपल्या शाळेला देखील विद्यार्थ्यांची गरज आणि ह्या चिमुकल्याना शिक्षणाची गरज हे हेरून त्यांना खळेगाव च्या निवासी शाळेत टाकल्या गेले त्याच शाळेतील पल्लवी चा वाढदिवस आम्ही पत्रकार मित्रांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयात साजरा केला. एकीकडे जगभर राष्ट्रमाता जिजाऊ आणि युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी होत असतांना त्याच दिवशी ह्या चिमुकलीचा आम्ही साजरा केलेला वाढदिवस मनाला सुखावून गेला.खरं म्हणजे लेक आता चार पुस्तक शिकते आहे, वाचून दाखवते आहे याचा आनंद झालेल्या जन्मदात्री ने मजुरीतील पैशातून तिच्यासाठी छान सा ड्रेस आणला आणि आम्ही केक व भेट वस्तू देऊन त्या चिमुकलीचा वाढदिवस साजरा केला.

देशातील सर्वांसाठी अच्छे दिन आले असल्याचा दावा एकीकडे केल्या जात असतांना,सर्वांना रहायला घर मिळेल असे देशवासियांना सांगितले जात असतांना आज देखील पालात वास्तव्य करणारे आणि शिक्षणापासून वंचित असणारे अशी अनेक चिमुकले आहेत. त्यांना जेव्हा सुखाचे दिवस स्पर्श करतील तेव्हाच खऱ्या अर्थाने अच्छे दिन आलेले असतील. माणसाकडे माणूस म्हणून बघितले की त्यातच खरा राम दडलेला आहे. मानवसेवा हीच खऱ्या अर्थाने ईश्वर सेवा आहे. ह्या चिमुकल्यांसाठी मला माझ्याच दोन ओळींची आठवण होते... जरी गेले असेल आमचे चंद्रावरती यान, सांगा पाहू कोण देईल आमच्याकडे ध्यान.

# हुशार शेतकरी

आधुनिक केसरी

एका गावात एक शेतकरी राहत होता. त्याला प्राणी पाळण्याचा खूप खूप छंद होता. त्याच्याकडे शेळी मेंढी वाघ गाय अशा प्रकारचे खूप प्राणी होती. शेतात त्यांना रोज चारण्यासाठी घेऊन जाई. वाघ शेळी या दोघांना तो नेहमी सोबत ठेवत असत कारण वाघाला शेळी खाईल याची त्याला भीती वाटते. एके दिवशी तो नदी पार करून आपल्या शेतात जातो. मध्ये गेल्यावरती तो शेळी साठी एक गवताची पेंडी तयार करतो. व खूप पाऊस चालू होतो. त्याला घरी येता वेळेस नदी पार करून यावे लागत.नदीला खूप पूर आला होता. शेतकरी शेळी वाघ व गवताची पिंडी घेऊन नदीकिनारी येतो. काही सुचत नाही की आता नदी कशी पार करावी.काय करावे असे तो विचारात पडतो तो मदत होईल का ते पाहू लागतो.किनारी त्याला एक नाव दिसते तो त्या नावे जवळ जातो. एका वेळेस दोन जणांना घेऊन जाईल या अवस्थेत होती. शेतकऱ्यापुढे प्रश्न पडला की आपण यांना नदीकिनारी कसे घेऊन जावे. शेतकरी विचार करतो की आपण जर पहिल्यांदा गवताची पेंडी घेऊन गेलो तर वाघ शेळीला खाऊन टाकेल व वाघाला घेऊन गेलो शेळी गवत खाऊन टाकेल. तू विचार करतो आणि नावे मध्ये शेळीला घेऊन दुसऱ्या टोकाला सोडून येतो. सिंहाला घेतो आणि दुसऱ्या टोकावर ती सोडून येतो आता तो आधी आपल्यासोबत परत या टोकावर घेऊन येतो व गवताला घेऊन जातो परत तो वापस येतो व शेळीला घेऊन जातो. अशी करून तो नदी सुखरूप पार करतो. **तात्पर्य : विचार करून काम केले तर कोणतीच गोष्ट अशक्य नाही**



# 11 कोटी 13 लक्ष रुपयांच्या 51 कामांचे भूमिपूजन

## आ. किशोर जोरगेवार : ग्रामीण भागात उपलब्ध होणार मूलभूत सोयी सुविधा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आ. किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नाने 11 कोटी 13 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. ग्रामविकास २५\१५ निधीतून मंजूर या निधीतून मतदार संघातील 51 कामे करण्यात येणार आहे. यात जवळपास ८ कोटी रुपये पांदन रस्त्यासाठी खर्च केल्या जाणार आहे. या सर्व कामांचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भुमिपूजन करण्यात आले आहे.

यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे ग्रामीण तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर, ग्रामीण कामगार आघाडी यंग चांदा ब्रिगेडचे, रुपेश झाडे,चिंचाळा च्या सरपंचा शोभा चिमुरकर, ग्रामविकास अधिकारी सुधाकर वासेकर, खुटाळा सरपंच ऋतिका नरुले, उपसरपंच रोशन रामटेके, वेंडली सरपंचा प्रतिमा अलवलवार, उपसरपंच राजकुमार नागपुरे, पडोली सरपंच विक्की लाडसे, दाताळा सरपंच सुनीता देशकर, मोरवा सरपंच स्नेहा साव, उपसरपंच भूषण पिदुरकर, म्हातारदेवी सरपंच संध्या पाटील, उपसरपंच शंकर उईके, पिपरी सरपंच वैशाली मातने, उपसरपंच हरिओम पटवले, सोनेगाव सरपंच संजीव उकीनकर, शेणगाव सरपंच सुष्मा मालेकर, ग्रामीण संघटक मुन्ना जोगी, छोटा नागपूर उपसरपंच ऋषभ दुपारे, गुड्डू सिंग, दाताळा माजी सरपंच रवी लोनगाडगे, साखरवाही सरपंच नागेश बोंडे, दिलीप चौधरी,  अनिल नरुले, श्यामकांत थेरे, जय मिश्रा शहर संघटक विश्वजीत शहा,



राशेद हुसेन, कार्तिक बुरेवार, कौरव जोरगेवार आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमात बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले कि, मतदार संघाच्या विकासकामांसाठी आपण निधी कमी पडू दिलेला नाही. शक्य त्या सर्व विभागातून आपण मोठा निधी या भागाच्या विकासासाठी उपलब्ध करुन दिला आहे. नुकतेच ग्रामीण भागातील शेतीच्या सिंचनाचा प्रश्न सुटावा याकरिता आपण 14 कोटी रुपये मंजुर करुन आनले आहे. या निधीतुन 10 गेटेड बंधारे तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे शेकडो हेक्टर शेतीचा प्रश्न सुटणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

मतदार संघातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी आपण वेळोवेळी मोठा निधी उपलब्ध करुन दिला आहे. मात्र या गावांच्या सर्व समावेशक विकासासाठी मोठ्या निधीची गरज होती. यासाठी आपल्याला 11 कोटी १३  लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करता आला आहे. या निधीतुन मतदार संघातील 10 गावातील 51 कामे आपण मार्गी काढले आहे. यात पांदन रस्ते, समाज भवन, व्यायामशाळा, रस्ता, नाली, सौदर्यीकरण यासह मुलभुत सोयी सुविधा उपलब्ध होणार असल्याचे यावेळी ते म्हणाले. शहराचा विकास गतीने होत असतांना मतदार संघातील ग्रामीण भाग दुर्लक्षीत राहू नये हा उदिष्ट आमचा राहिला आहे. याकरिता समान वाटप आपण केले आहे. गावात वाचनालय, समाज भवन उपलब्ध करुन देण्याच्या दिशेनेही आमचे प्रयत्न सुरु आहे. काही गावांमध्ये यासाठी आपण निधीही उपलब्ध करुन दिला असल्याचे ते यावेळी म्हणाले. ग्राम विकास निधी २५\१५ अंतर्गत मंजूर निधीतून दाताळा येथे 1 करोड 31 लक्ष रुपयांतून 5 विकासकामे केल्या जाणार आहे, नागाळा, चिंचाळा मार्गासाठी 20 लक्ष रुपये, नागाळा येथे समाज भवणासाठी 25 लक्ष रुपये, नागाळा - वांढरी ते मोरवा पर्यंतच्या पांदण रस्त्यासाठी 30 लक्ष रुपये, नागाळा येथील पांदण रस्त्यासाठी 11 लक्ष रुपये, वांढरी नागाळा या पांदण रस्त्यासाठी  28 लक्ष रुपये, चिंचाळा येथील गुरुदेव सेवा मंडळाच्या सुरक्षाभिंतीसाठी 20 लक्ष रुपये, चिंचाळा येथील सिमेंट रोडच्या कामासाठी 30 लक्ष रुपये, खुटाळा येथील तुकडोजी महाराज यांच्या सभागृहासाठी 40 लक्ष, खुटाळा येथील सामाजिक भवनाच्या कामासाठी 25 लक्ष, मोरवा - चारगाव पांदण रस्त्यासाठी 30 लक्ष, मोरवा येथील समाज भवनासाठी 30 लक्ष, म्हातारदेवी येथील खडीकरणाच्या कामासाठी 30 लक्ष, म्हातारदेवी येथील सामाजिक भवनासाठी 41 लक्ष, पिपरी येथील समाज भवनाच्या कामासाठी 30 लक्ष रुपये, पिपरी - मारडा पांदण रस्त्याच्या खडीकरणासाठी 30 लक्ष रुपये, वेंडली येथील पांदण रस्त्यासाठी 30 लक्ष रुपये, सोनेगाव येथील पांदण रस्त्यासाठी 30 लक्ष रुपये, सोनेगाव अंतर्ला येथील पांदण रस्त्सासाठी 28 लक्ष रुपये, सोनेगाव येथील व्यायाम शाळेसाठी 20 लक्ष रुपये, शेणगाव ते साखरवाही पांदण रस्तासाठी 28 लक्ष रुपये, शेणगाव येथील समाज भवनाच्या कामासाठी 45 लक्ष रुपये असा निधी मंजुर करण्यात आला आहे. यासह ईतर कामेही 11 कोटी रुपयांच्या निधीतुन केल्या जाणार आहे. इंदिरानगर येथील लोहार समाजाच्या समाज भवनासाठी २५ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून सदर कामाचेही यावेळी भूमिपूजन झाले या सर्व कामांच्या भुमिपूजन कार्यक्रमाला ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# बालिकेवर अत्याचार; आरोपींना तत्काळ अटक करून फाशी देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे**

**मुदखेड :** रोहिपिंपळगाव तालुका मुदखेड येथील सहा वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घूण खून करण्यात आला. माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना घडली असून शासनाने वारंवार होणाऱ्या अशा घटनेबद्दल कायद्यात बदल करून कायदा अधिक कडक करावा व आरोपींना तात्काळ अटक करून फाशी देण्यात यावी अन्यथा उमरी तालुक्यातील सर्व जाती धर्मातील नागरीकांतर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल. या मागणीचे आज तहसील कार्यालय उमरी येथे निवेदन देण्यात आले.

यावेळी सुभाषराव देशमुख गोरठेकर, अमोल पा ढगे, राजेश आण्णा जाधव, योगेश पा मोरे, दत्ताहरी पा ढगे, राजेश पा मोरे,दत्ता पा जाधव, विजय पा चव्हाण, आतुल अचकुलवार,भगवान पा भोसले, अजय पा चव्हाण,गोविंद पवार, शेषेराव स्वामी, नाना वाघमारे, योगेश शिंदे, माधवराव ढगे व इतर उमरीवासीय उपस्थित होते.

# नमो चषकसाठी शिरपूरमधून दोन लाखांहून अधिक युवकांनी केली नोंदणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राज्यातील तरुणाईच्या व्यक्तिगत विकास व खेळाडू वृत्तीला आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी महाराष्ट्र राज्य भारतीय जनता पक्षाच्या वतीने नमो चषक स्पर्धांच आयोजन करण्यात आलंय. विधानसभा, लोकसभा, विभागीय व राज्यस्तरीय स्तरावर या स्पर्धा घेतल्या जाणार असून या स्पर्धांमध्ये कुस्ती, फुटबॉल, खो-खो, धावणे, रस्सीखेच, क्रिकेट, व्हॉलीबॉल सह कॅरम, बुद्धिबळ, नृत्य, एकांकिका, चित्रकला, रांगोळी यांसारख्या अनेक खेळांचा सहभाग करण्यात आला आहे. यासंदर्भात राज्य नमो चषकचे अध्यक्ष प्रतापराव दिघावकर यांनी धुळ्यात पत्रकार परिषद घेत या राज्यभरातून खेळाडूंचा उदंड प्रतिसाद लाभत असल्याच सांगितलं.धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातून सर्वाधिक म्हणजेच तब्बल 2लाखांहून अधिक युवकांनी या स्पर्धांसाठी नोंदणी केली असल्याच यावेळी दिघावकर यांनी सांगितलं.



# संभाजी ब्रिगेडच्या वतीने गटविकास अधिकारी प्रमोद बदरखे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :**  पंचायत समिती येथे गेल्या अनेक दिवसापासून गटविकास अधिकारी नसल्याकारणाने सर्वसामान्यांची कामे कोळंबली होती त्या अनुषंगाने कर्तव्यदक्ष असलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी वसुमना पंत यांनी गटविकास अधिकारी बदरखे यांची रिसोड पंचायत समिती येथे नियुक्ती केली आहे. नव्यानेच रुजू झालेले गटविकास अधिकारी यांची काम करण्याची पद्धत अतिशय चांगली आणि गोर गरिबांची कामे व्हावी हा उद्देश ठेवून त्यांचे कार्य सुरू असते त्या अनुषंगाने संभाजी ब्रिगेडचे जिल्हा कार्याध्यक्ष विनोद पाटील खडसे यांच्यासह संभाजी ब्रिगेड रिसोड तालुक्याच्या वतीने नवनिर्वाचित गटविकास अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले .आहेत पंचायत समितीमध्ये रखडलेले कामे तातडीने व्हावे अशी विनंती देखील यावेळी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे. प्रसंगी गणेश पवार रमेश पाटील सदर शुभम पवार ऋषिकेश महाजन हे उपस्थित होते.



# विशाल महाराज गडगे यांना 'स्वामी विवेकानंद युवा प्रेरणा पुरस्कार' प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** आळेफाटा (ता.जुन्नर) येथील सामाजिक कार्यकर्ते विशाल महाराज गडगे यांना संत साहित्याचे अभ्यासक व मुख्य वनसंरक्षक नागपूर रंगनाथ नाईकडे (भा.व.से.) यांच्या हस्ते 'स्वामी विवेकानंद युवा प्रेरणा पुरस्कार २०२४ ' प्रदान करुन नुकतेच गौरविण्यात आले. युवकमित्र परिवार, पुणे यांच्या वतीने राष्ट्रीय युवा दिनानिमित्त पत्रकार भवन येथे आयोजित पाचव्या राज्यस्तरीय युवा संमेलनात हा पुरस्कार वितरण सोहळा बुक क्लब संस्थापक अविनाश निमसे, राजेंद्र खराडे, मंथन फाउंडेशन संस्थापिका आशा भट्ट,मंगलाताई नागुल, प्रल्हाद महाराज डांगे,युवकमित्र परिवार संस्थापक प्रविण महाजन, सचिन म्हसे, प्रा.डॉ. सुनिल धनगर यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला.




विवेकानंदाच्या स्वप्नातला भारत घडविण्यासाठी आजच्या युवकांनी कठोर परिश्रम घेणे गरजेचे असून अंगी असलेल्या युवाशक्तीद्वारा देशासमोरील आव्हानावर उपाय शोधणे गरजेचे असल्याचे मत प्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते,लेखक रंगनाथ नाईकडे यांनी व्यक्त केले.विशाल महाराज गडगे यांना श्री संत सावता माळी युवक संघ महाराष्ट्र राज्य संघाच्या माध्यमातून केलेल्या सामाजिक कार्याची व आध्यात्मिक, साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेवून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विशाल महाराज गडगे यांचे खासदार डॉ.अमोल कोल्हे, गोमाता पतसंस्था अध्यक्ष सुरेशशेठ गडगे, अशोक गडगे, श्री संत सावता माळी युवक संघ महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष सचिन गुलदगड, अनुराधा गडगे, जुन्नर तालुका अध्यक्ष संजय शिंदे, डॉ.पुष्पलता शिंदे, यशोदीप पब्लिकेशन्स प्रकाशक निखिल लंभाते, रुपाली अवचारे, प्रा.विजय लोंढे, साहित्यिक संदिप वाघोले, संतोष गडगे, वासुदेव जंबूकर, भाऊसाहेब मेहेर  यांनी अभिनंदन केले.



# पत्रकार बांधवांच्या वतीने विस्तार अधिकारी संदीप मोरे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** पुण्याच्या ग्लोबल स्कॉलर फाउंडेशन कडून राज्यस्तरीय भुषण पुरस्कार मिळाल्याबद्दल जळगाव जामोद पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संदीपकुमार मोरे यांचे जळगाव जामोद पत्रकार बांधवांच्या वतीने १६ जानेवारी रोजी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

पुणे यशोदा येथे ७ जानेवारीला पद्मश्री पुरस्कार प्राप्त सुधाकर ओळवे यांचे हस्ते पुणे येथे सपत्नीक सन्मान चिन्ह देवून सन्मानित करण्यात आले आहे.

संदिप मोरे हे एक कर्तव्यदक्ष अधिकारी असून त्यांनी कोरोना काळात सामाजिक भान जपत रक्तदान शिबिरे, गरजवंताना अन्नदान केले आहे.१५२५ लोकांना जागा शासकीय धोरणानुसार उपलब्ध करून देवून लाभार्थ्यांना घरकुल मिळवून दिले आहे.आपल्या कर्तव्यप्रती जागृत राहून त्यांनी अनेक सामाजिक कार्यात महत्त्वाचं योगदान दिलं आहे. त्यामुळे जळगाव जामोद पत्रकार बांधवांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी तालुकाध्यक्ष गुलाबराव इंगळे, जयदेव वानखडे,सागर झनके,नागेश भटकर, विनोद वानखडे निलेश वानखडे,आणि सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर राहणारे मुरलीधर पाटील हजर होते.

# तलाठी पदासाठी घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** राज्य शासनाकडून 2023मध्ये तलाठी पदासाठी घेण्यात आलेली तलाठी भरती प्रक्रिया ही पहिल्या दिवसापासूनच संशयाच्या भोवऱ्यात होती. या तलाठी भरती पेपर फुटी प्रकरणात अनेक गुन्हे सुद्धा दाखल झाले आहेत. यासंदर्भात स्पर्धा समन्वय समिती धाराशिव, यांच्यामार्फत दिनांक 11जानेवारी 2024 रोजी धाराशिव जिल्हाधिकारी मा.सचिन ओम्बासे यांना अनेक ठिकाणी पेपर फुटल्याने ती भरती रद्द करुन 45 दिवसांच्या आत MPSC मार्फत फेरपरिक्षा घेण्यात यावी यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

निवेदन स्वीकारते वेळी जिल्हाधिकारी साहेबांकडून जिल्ह्यातील 200 पेक्षा अधीक गुण घेणाऱ्या 3 उमेदवारांची चौकशी करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.

जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देते वेळी,स्पर्धा परिक्षा समन्वय समिती,धाराशिव जिल्हा अध्यक्ष चव्हाण पंचशिला,सदस्य सारंग राऊत,सागर वडवले,अनुप शिंदे,वासुदेव गायकवाड उपस्थित होते.

# बाजारसावंगीत उभी राहणार वाचनालयाची वास्तू

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील जुनी ग्रामपंचायत कार्यालय इमारत पाडून तेथे नवीन वाचनालय इमारत उभी राहणार असल्याने वाचकांची मांदयाळी होणार आहे. कित्तेक वर्षांपासून नागरिकांची इच्छा-आकांक्षा होती की बाजार सावंगी ग्रामपंचायत अंतर्गत वाचकांसाठी वाचनालय हवे यासंदर्भात माजी सरपंच भिमराव नलावडे यांच्या कडे मागणी व सुचना करण्यात आल्या होत्या.

मात्र ग्रामपंचायत साठी कार्यालय उपलब्ध नसल्याने वाचनालय आता पर्यंत रखडून होते. सुदैवाने ग्रामपंचायत कार्यालय झाले त्यात मा. आमदार सतिष भाऊ चव्हाण यांनी नवीन इमारत साठी निधी उपलब्ध करून दिली. तर जुनी ग्रामपंचायत कार्यालय इमारत पाडण्यात आली. तर आता नव्याने सदर इमारत वाचनालयासाठी उभारण्यात येणार असून वाचकांची इच्छा पुर्ण होणार त्यात वाचनालय अतिआवश्यक होते कारण चारपाच महाविद्यालय, तीनचार माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण शाळा, दळणवळण सेवा, बॅंकीग, पोस्ट, पोलिस चौकी, बाजार पेठ, आठवडी बाजार, विद्युत केंद्र व दैनंदिन व्यवहार येथूनच असल्याने विविध माहिती साठी विविध दैनिक वाचणासाठी वाचनालयाची गरज होती. आज रोजी मा.आमदार . सतिष भाऊ चव्हाण पाटील यांच्या माध्यमातून तथा विद्यमान सरपंच आप्पाराव पाटील नलावडे माजी सरपंच भिमराव नलावडे उपसरपंच कारभारी नलावडे तथा ग्रामपंचायत कार्यकारिणी यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन वास्तू उभारण्यात येणार असल्याने व विद्यार्थी, नवयुवक, तरुण, व्यावसायीक, नौकरदार यांना वाचनालयाचा फायदा होणार असल्याने आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

# संतप्त शेतकऱ्यांकडून कापसाची 'होळी'

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** शेतमालाला योग्य भाव मिळावे, ही मागणी सातत्याने होते. अगदी २५ वर्षांपूर्वी शरद जोशी यांनी, "भिक नको, हवे घामाचे दाम" म्हणत रान पेटविले होते. आजही तेच दुःख असल्याची भावना आर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीत दिसून आली. कापूस घेवून येणाऱ्या शेतकऱ्यांना पडलेले भाव मिळत असल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. प्रहार सोशल फोरमचे बाळा जगताप यांच्या नेतृत्वात शेतकरी बंधूंनी उभा कापूस पेटवून दिला. प्रतिक्विंटल दहा हजार रुपये देण्याची मागणी करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करून देण्याचे आश्वासन दिले होते. दुप्पट तर सोडाच पण लागवड खर्चही निघत नाही. चार वर्षापूर्वी जो भाव मिळत होता, तेवढाही आता मिळत नाही. त्या तुलनेत खते, किटनाशक याचे भाव गगनाला भिडले आहे. सोयाबीन सात हजार रुपये क्विंटल होते ते आता साडेचार हजार भावाने विकावे लागत आहे. केंद्राने राज्यांना जे हमी भाव पाठविले ते सुद्धा मिळू शकत नाही. मग दुप्पट हमीची शेखी कशी मिरविता, असा सवाल जगताप यांनी केला. कापसाला दहा हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळालाच पाहिजे, तरच दोन पैसे पदरात पडतील. आज मिळणाऱ्या भावाने लागवड खर्चही निघत नाही. एकीकडे निसर्ग तर दुसरीकडे सरकार झोडपत आहे. हे लुटीचे धोरण बंद झाले पाहिजे. आज आम्ही आमचाच कापूस पेटवित आहे. जर धोरणात बदल झाला नाही तर वेगळा विचार करावा लागेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. आंदोलन झाल्यावर आर्वी उपविभागीय अधिकारी यांना पंतप्रधान मोदी यांच्या नावे मागणीचे निवेदन देण्यात आले.

# 'त्या' पोलीस कर्मचाऱ्यांचे निलंबन

## आधुनिक केसरीच्या वृत्ताची दखल घेऊन कारवाई

आधुनिक केसरी न्यूज



**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार पोलीस ठाण्यात कार्यरत पो कॉ देशमुख यांनी पोलीस ठाणे म्हणजे जहागिरीत मिळालेले दान असे समजून सर्व सामान्यांशी असभ्य वर्तन करून अवैध धंदे चालकांचा पाठीराखा ठरत कर्तव्य विसरून कार्य करत असल्याची तक्रार वडोद बाजार ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी ग्रामिण पोलीसांना तक्रार केली होती. याची दखल घेऊन आर डी देशमुख यांना वरिष्ठांकडून निलंबनाची कार्यवाही केली असल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे. वडोद बाजार ता फुलंब्री पोलिस ठाण्यात आर. डी. देशमुख हे पोलीस कर्मचारी अंदाजे ३ वर्षापूर्वी पिशोर येथुन बदलुन आले होते काही दिवस त्यांनी कर्मचारी म्हणून काम केले . नंतर यांनी बीट जमादार म्हणून काम सुरु केले . नंतर वरिष्ठांची मर्जी संपादन करत अवैध धंदे चालकांचा दुवा म्हणून व नंतर अवैध धंदे चालकांचा हप्ता वसुली व ठाण्याचा सुत्रधार म्हणून काम पाहु लागला . त्याकडे स्थानिक वडोद बाजार बीट ची जबाबदारी देण्यात आली . आणि वरिष्ठांच्या मेहरबानी संभाळून अवैध धंदे चालकांची उठ बस वाढली . कर्तव्य विसरून अनाधिकृत कामाला यावेळी उधान येऊ लागले . यामुळे देशमुख यांची देशमुखी जागी होऊन ते सर्वसामान्य जनतेशी असभ्य भाषेचा वापर करून आपण माझ काही वाकड करू शकत नाही . तक्रार कुठे करायची ती करा . यामुळे त्रस्त ग्रामस्थांनी सदर बाब वडोद बाजार ग्रामपंचायतीकडे व ग्रामिण पोलीस अधिक्षक यांच्या कडे २१ नोव्हेंबर २०२३ रोजी केली होती .अखेर ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय वडोद च्या सर्व पदाधिकारी यांनी १२ डिसेंबर २०२३ रोजी ग्रामस्थांचा तक्रारीसह ग्रामिण पोलीस अधिक्षक छत्रपती संभाजी नगर यांच्या कडे लेखी तक्रार दाखल केली होती . बोकाळलेले अवैध धंदे व कर्मचार्याचे असभ्य वर्तन यामुळे सर्वसामान्यांच्या मनात पोलीस खात्याची प्रतिमा मलीन होत चालली होती .




, वडोद बाजार येथुन परिसरात खोक्याद्वारे अवैध दारू विक्री साठी दारूची वाहतुक भरदिवसा राजरोस सुरु आहे , अवैध गुटखा विक्री करणारे गुटखा किंग भर दिवसा दुचाकीवर गोण्या बांधून पान टपऱ्यावर गुटखा विक्रीसाठी पुरत आहेत , अवैध मुंबई कल्याण जुगार मोबाईल वर खेळला जात आहे सट्टा - पत्ता यासह अनेक अवैध धंदे जोरात सुरू आहे . या तक्रारी सह परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्या बाबत सुरु असलेल्या वृत्त पत्राच्या बातम्या या सर्व प्रकारामुळे आर डी देशमुख यांचे ग्रामिण पोलीस अधिक्षक छत्रपती संभाजीनगर (ग्रामिण) यांनी देशमुख यांचे निलंबन करण्यात आले आहे . मात्र या बाबत गुप्तता पाळण्यात येत आहे . काही वरिष्ठ अधिकारी यांचा हप्ता खोरी मुळे देशमुख यांना पाठीशी घालत होते हे विशेष.



# भांडेगाव येथे राजमाता जिजाऊ जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

खुलताबाद : तालुक्यातील भांडेगाव येथे शांती शिवबाबा सार्वजनिक वाचनालयातर्फे राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पुजन मुख्याध्यापक होळकर सर, रामेश्वर वेताळ, यांनी केले यावेळेस उपस्थित जे एस वेताळ, सुभाष वेताळ तातेराव वेताळ, सुभाष चव्हाण, शहाजी वेताळ, गणेश वेताळ, गणेश घुले, शेषराव वेताळ, रुक्मिण वेताळ, साक्षी वेताळ, आणि सुभाबाई हे उपस्थित होते.

# ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील ज्ञानकुंज महाविद्यालयात क्रिडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार रोजी ज्ञानकुंज कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल स्कूल बाजार सावंगी येथे महाराष्ट्र राज्य क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आल्या ऑलिंपिकवीर स्वर्गीय खाशाबा जाधव यांचा जन्मदिन ``राज्य क्रीडा दिन `` म्हणून क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी महाविद्यालयामध्ये मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धे मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये कु. ऊद्धव बाबासाहेब विटेकर - प्रथम व कु. ऋषिकेश विजय बाहुले - दुवितीय व कु. कुणाल रमेश नलावडे - तिसरा आला आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजुर्के प्रा. मनोज राणे, प्रा.नितीन पवार, प्रा.राम राठोड,प्रा.कृष्णा चव्हाण,प्रा.योगेश सुरडकर,प्रा.दीपक पाटील,प्रा.राहुल गायकवाड,श्री भूषण जाधव,श्री. अविनाश कोलते,खान मॅडम ,श्रीमती पाचवने मॅडम,श्रीमती चोपडे मॅडम, शिपाई धुमाल बाबा, वाहतुळे मावशी यांची उपस्थिती होती.



# विदर्भ साहित्य संघाने नव्या पिढीला नवी प्रेरणा व दृष्टी दिली : गडकरी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विदर्भ साहित्य संघ हे साहित्याच्या



क्षेत्रात दैदीप्यमान कामगिरी करीत असून या विदर्भ साहित्य संघाने अनेक नामवंत साहित्यिक महाराष्ट्रालाच नाही तर संपूर्ण देशाला दिले आहेत. विदर्भ साहित्य संघाचा १०० वर्षांचा इतिहास हा देदीप्यमान असून अनेक प्रतिभावंत व्यक्तींनी आपल्या प्रतिभेने संस्थेचा गौरव वाढविला व साहित्याच्या क्षेत्रात मानाचे स्थान निर्माण करून दिले. वि.सा. संघाने आपल्या शतकीय वाटचालीत नव्या पिढीला नवी प्रेरणा आणि दृष्टी देण्याचे काम केले, असे गौरवोद्गार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काढले. विदर्भ साहित्य संघाचा शतकोत्तरी प्रथम वर्धापनदिन सोहळा रविवारी विदर्भ साहित्य संघाच्या रंगशारदा सभागृहात थाटात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ना. नितीन गडकरी बोलत होते. या समारंभात ज्येष्ठ साहित्य संशोधक डॉ. म. रा. जोशी यांना साहित्य वाचस्पती' ही सर्वोच्च मानद उपाधी देऊन सन्मानित करण्यात आले. तर ज्येष्ठ लेखिका आशा पांडे यांना साहित्य सेवा गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याच कार्यक्रमात विविध वाङ्मय पुरस्कार मान्यवर लेखकांना देखील यावेळी प्रदान करण्यात आले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते होते. ज्येष्ठ साहित्यिकि व अभ्यासक डॉ. अक्षयकुमार काळे, अमळनेर येथे होणाऱ्या ९७ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, वि. सा. संघाचे विश्वस्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. म. रा. जोशी, आशा पांडे, सरचिटणीस विलास मानेकर, राजेंद्र डोळके, वि. सा. संघाच्या यवतमाळ शाखेचे उपाध्यक्ष रमाकांत कोलते यांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी 'विदर्भ साहित्य संघाचा १०० वर्षांचा इतिहास' या ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले, ग्रंथाचे लेखक डॉ. विलास देशपांडे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

पुढे बोलतांना गडकरी म्हणाले, वि. सा. संघाच्या अनेक शाखा विविध ठिकाणी आहेत. पूर्वी, या शाखातर्फे गावा-गावांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित केले जात असत. त्यातून साहित्य, संस्कृती , प्रबोधन, प्रशिक्षण, संस्कारांची चर्चा होत असे. समाजासाठी हे उत्तम साहित्यिक, सांस्कृतिक व्यासपीठ होते. वर्तमानातही या संस्थेने शाळा, महावद्यिालयातील विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्य, संस्कृतीचा प्रचार व प्रसार करावा व चांगले नेतृत्व, व्यक्तिमत्व घडवावे. वि. सा. संघाचे माजी अध्यक्ष स्व. मनोहर म्हैसाळकर यांच्या कार्याचा गौरव करतांना वक्तादशसहस्त्रेशु राम शेवाळकर यांचाहि त्यांनी उल्लेख केला. आशा पांडे व डॉ. म. रा. जोशी यांच्या साहित्यिक प्रवासाचेही त्यांनी कौतुक केले. विदर्भ साहित्य संघाने ही साहित्यिक चळवळ लोकाभिमुख करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्रदीप दाते यांनी पुरस्कार प्राप्त साहित्यिकांचे अभिनंदन केले. सत्काराला उत्तर देताना डॉ. म. रा. जोशी यांनी मराठी भाषेचे अनेक प्रश्न असून ते डोळसपणे हाताळले पाहिजे, असा विचार व्यक्त केला. राजेश जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रकाश एदलाबादकर यांनी मानपत्र वाचन केले. कार्यक्रमाचे संचालन विवेक अलोणी व वृषाली देशपांडे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. राजेंद्र डोळके यांनी केले, राधा ठेंगडीने पसायदान सादर केले.

श्रेष्ठ लेखक पैसा, प्रसिद्धी, कीर्तीसाठी लिहित नाही तर त्याला लिहिल्याशिवाय राहवत नाही म्हणून तो लिहितो. जबरदस्तीने कविता आल्यावर सरस कविता विरस होत जातात . लेखक स्वतः अंतर्मुख होऊन बहिर्मुख होताना समाजातील आघात, वेदनांचा साक्षात्कार जो लेखनात उतरवतो तो श्रेष्ठ साहित्यिक असतो. नवोदित लेखकांनी आपण कशासाठी लिहितो याचा विचार करावा आणि प्रगल्भ, डोळस साहित्यदृष्टी असली तरच लेखन करावे, असेही डॉ. अक्षयकुमार काळे म्हणाले.

**ज्येष्ठ साहित्यिक अक्षय काळे यांनी नव कविंचे कान टोचले :** सध्याच्या काळात नव कवींची संख्या वारेमाप वाढत चालली आहे . प्रसिद्धीच्या झोतासाठी आपण काय लिहितो याकडे त्यांचे लक्ष कमी आणि लाईक, कमेंट व शेअर याकडे त्यांचे लक्ष जास्त वाढलेला आहे . जबरदस्तीने ओढून ताणून दोन चार ओळी लिहिल्या जातात आणि पुढे त्याच्यावर लाईक आणि कमेंट चा भडीमार होत जातो . खरंतर मनाच्या शांत अवस्थेत काव्याचे स्फुरण होत असते . परंतु, सध्याचे नवकवी आणि नवीन लेखक सुद्धा प्रसिद्धीच्या मागे लागल्याने कवितेचा व लिखाणाचा दर्जा खालावत चाललेला आहे . अशी खंत त्यांनी व्यक्त केली . भाडोत्री सैनिकांना घेऊन जसे युद्ध जिंकता येत नाही तसे उसना अनुभव घेऊन साहित्य निर्मिती होऊ शकत नाही . पौराणिक साहित्य ऐतिहासिक वाङ्मय याचीही इयत्ता कमी होत चालली आहे . लेखकांनी या सगळ्या गोष्टीचा गांभीरणे विचार करायला हवा असं म्हणत ज्येष्ठ साहित्यिक अक्षय काळे यांनी नवकवी आणि लेखकांची काने टोचली .

# शालेय पोषण आहारात विद्यार्थ्यांना मिळणार आता अंडा बिर्याणी

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** शालेय पोषण आहाराच्या माध्यमातून मुलांना सकस आहार देऊन त्यांची शाळेतील उपस्थिती नियमित करण्याचा हेतू आहे. आता नवा हेतू ठेवण्यात आला आहे. सध्या या आहारात तांदळापासून बनलेल्या पाककृतीच्या स्वरूपात लाभ मिळतो. आता नाविन्यपूर्ण उपक्रम आला. नियमित आहार देतानाच अतिरिक्त पूरक पौष्टिक आहार मुलांना द्यावा, असे प्राथमिक शिक्षण विभागास वाटते. कृषी विभागानेही तशी विनंती केली आहे. अंडी उत्पादक शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठ मिळण्यासाठी पंतप्रधान पोषण शक्ती निर्माण योजनेत अंड्यांचा समावेश करण्याची विनंती कृषी खात्याने केली. उच्च प्रथिने, उष्मांक, जीवनसत्वे, कॅल्शियम, कार्बोहाइड्रेट अंड्यात असल्याने त्यामुळे विद्यार्थ्यांची वाढ चांगली होईल. रोगप्रतिकार शक्ती वाढेल. या भावनेने नियमित आहार देतानाच अंडी, केळी पोषण आहारात उपलब्ध करून देण्याचा निर्णय शिक्षण खात्याने घेतला आहे. आठवड्यातून एक दिवस अंडी मिळतील. अग्रिम अनुदान म्हणून या जानेवारीत प्रतिविद्यार्थी प्रतिआठवडा एका अंड्यामागे पाच रुपये लागू झाले आहे. ग्रामीण भागात शाळा व्यवस्थापन समितीने स्थानिक बाजारपेठेतून अंडी खरेदी करावी. बुधवार किंवा शुक्रवारी उकळलेले अंडे, अंडा पुलाव किंवा अंडा बिर्याणी या स्वरूपात द्यावे. जे विद्यार्थी शाकाहारी आहेत त्यांना केळी अथवा स्थानिक फळ उपलब्ध करून द्यायचे आहे. याची अंमलबजावणी पात्र शाळेतून नियमित होईल, याबाबत प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना घ्यायची आहे. या उपक्रमाची जनजागृती विविध माध्यमातून करण्याची सूचना आहे. विद्यार्थ्यांना लाभ दिला मात्र त्याची नोंद पोर्टलवर केली नसल्यास त्याचे अनुदान मिळणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नियमित वाटप होत आहे अथवा नाही, याची खातरजमा वारंवार भेट देऊन करायची आहे.



# सिने अभिनेता विजय मानवतकर यांना राष्ट्रीय समाजभूषण सन्मान पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भारतीय परिर्वतन पार्टी यांनी विजय मानवतकर यांना राष्टीय समाजभूषण सन्मान पुरस्कार देऊन गौरविले उदयगिरी लॉयन्स धर्मदाय नेत्र रुग्नालय यांच्याकडून शाल पुष्पगुच्छ स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच अंध कलांवता साठी एक दिवसीय प्रशिक्षण जय साई नटराज नाव्य चित्रपट कला व सांस्कृतिक संस्थे च्या माध्यमातुन अंध कलाकारांना गित अभिनय प्रशिक्षन मार्गदर्शन देण्यात आले या प्रसंगी पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष महादेव भंडारे उदयगिरीलॉयन्स क्लब चे सदस्य लक्ष्मीकांत जी मुराद शेख शमीना शेख फारुकी व ईतर पदधिकारी कर्मचारी व अंध विध्यार्थी अंध कलावंवा च्या उपस्थीत हा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला संस्थे च्या माध्यमातुन अंध कलाकारान च्या मुलाखती घेण्यात आल्या द्य कार्यक्रम उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्नालय अतिथी हॉल उदगीर ला घेण्यात आला.

# अभ्यास दौऱ्यासाठी गटविकास अधिकारी व सरपंच करणसिंग राजपूत यांचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जिल्हा परिषदेच्या राष्ट्रीय ग्रामीण स्वराज्य अभियान अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून राज्य बाहेर अभ्यास दौऱ्यासाठी आदर्श ग्रामपंचायत सरपंच व अधिकारी यांची निवड करण्यात आलेली आहे. गुरुवारी दिनांक 11 रोजी संभाजीनगर जिल्ह्यातून 11 प्रशिक्षणार्थी राजस्थान कडे रवाना झाले आहे यात वरिष्ठ अधिकारी व सरपंच यांचा समावेश आहे मराठवाड्यातून चार जिल्ह्याचे अधिकारी व सरपंच दौऱ्यावर आहे यात आपल्या जिल्ह्यातून मुख्य कार्यकारी ओमप्रकाश रमावत सर, खुलताबाद चे गटविकास अधिकारी प्रकाश नाईक वैजापूर देव घूनावत, गंगापूर स्नेहल शेलार, अधिकारी जिल्हा परिषद विस्तार पंचायत दीपक बागुल यात ग्रामसेवक सुनील मंगुळे शिवराज गायके प्रल्हाद शिंदे योगेश घाटबळे, व सरपंच मधून करणसिंह राजपूत व सरला तांदळे यांचा समावेश आहे सदरील दौरा हा सहा दिवस चा आहे यात विविध ग्राम पंचायती पंचायत समिती जिल्हा परिषद यांची भेट व कार्यप्रणाली यांची सविस्तर माहिती व अभ्यास करून मंगळवार रोजी सर्वजण परत येणार आहे. यामध्ये 9 अधिकारी व 2 सरपंच ग्रामपंचायत चा समावेश आहे.



# जयाद्री माऊंटनमध्ये प्रथमच पिंगोरीमिनी मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

## हजारो स्पर्धेकांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**वाल्हे :** निसर्गसंवर्धन आणि पर्यावरण रक्षण जनजागृती करिता अक्युरेट पावर आणि इला फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जयाद्री च्या डोंगरकुशीतून पिंगोरी मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले यात हजारो निसर्गप्रेमीनी सहभाग दर्शवत ही स्पर्धा उत्साहात पार पाडली. सैनिकांचे गाव म्हणून सुप्रचित असलेल्या प्रत्येक पिंगोरीकरांनी या स्पर्धेत आपला ठसा उमटवला असून निसर्गवन्य प्राणी संवर्धन आणि व्यायामाचे महत्व पोहोचवून ही स्पर्धा लक्षवेधी ठरली.
महिलांमध्ये शितल तांबे व पुरूष गटात प्रविण टकले यांनी 'पिंगोरी माउंटन मिनी मॅरेथॉन २०२४ चे विजेतेपद पटकावले.
'पिंगोरी माउंटन मिनी मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. येथील रहिवाशी आणि ॲक्युरेट पावरटेक कंपनीचे संचालक उद्योजक महेंद्र यादव तसेच इला फाउडेशनचे संस्थापक डॉ.सतिश पांडे यांनी सकाळी सात वाजता राष्ट्रगीत झाल्यानंतर स्पर्धकांना निशाण दाखवुन स्पर्धेला जोशात प्रारंभ झाला. यावेळी सरपंच संदिप यादव, डॉ.सुरूची पांडे, संध्या यादव, बाबा शिंदे, जीवन शिंदे, राजकुमार पवार, राहुल लोणकर, उपसरपंच भाग्यश्री शिंदे, ज्योती
शिंदे, अनिता शिंदे, विशाल गायकवाड, माजी सरपंच दत्तात्रय पवार, पोपट कांबळे, कुलदिप शिंदे आदि उपस्थित होते. निसर्ग व वन्यप्राणी संवर्धनाचा संदेश देण्यासाठी ॲक्युरेट पावर व इला फाऊडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'पिंगोरी माउंटन मिनी मॅरेथॉन' स्पर्धा झाली. स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्यातील हजारो खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेला स्पर्धकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना टी शर्ट व मॅरेथॉन पुर्ण करणाऱ्या प्रत्येकाला मेडल्स तर विजेत्यांना रोख पारितोषिक तर युवतींसाठी विशेष पारितोषिके देण्यात आले असुन भविष्यातही अशा स्पर्धा घेणार असल्याचे उद्योजक महेंद्र यादव यांनी सांगितले.
जिल्ह्यातुन आलेल्या स्पर्धकांची सकाळ आज दमदार होती.
रविवारचा सुट्टीचा दिवस फिटणेससाठी समर्पित केला. ॲक्युरेट पावर व इला फाऊडेशनद्वारे आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉन स्पर्धेत लहानग्यांपासुन ते आजोबा-आजीपर्यंत सर्वजण मनसोक्त धावले. सह्याद्रीच्या डोंगर रांगामध्ये पहिल्यांदाच भल्या पहाटे सुरू झालेल्या या मॅरेथॉनचे उपस्थित अनेकांनी आवर्जुन कौतुक केले.
यास्पर्धेमधील विजेते पुढीलप्रमाणे- महिलाः शितल तांबे (प्रथम), कामिनी राजीवडे (द्वितीय), मनिषा मोटे (तृतीय). पुरूषःप्रविण टकले (प्रथम), गोपाल चव्हाण (द्वितीय), मारूती तांबे (तृतीय). इला फाऊडेशनचे संस्थापक डॉ. सतिश पांडे यांनी प्रास्ताविक केले. प्रकाश शिंदे यांनी सुत्रसंचालन केले तर सिद्धार्थ घाडगे यांनी आभार मानले.

# कापूस जिनिंग कंपनीचा नागरिकांना नाहक त्रास

## परसामळ येथील वर्धमान कोटेक्स जिनिंग कंपनीचा नागरिकांच्या जिवाशी खेळ?

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील व शिंदखेडा तालुक्यातील परसामळ गावातील नागरिकांना बेकायदेशीर कापूस जिनिंग व प्रेसिंग कंपनीचा नाहक त्रास होत आहे. सदर ही कापूस जिनिंग रहिवास कॉलनीपासून दहा मीटर अंतरावर असल्याने येथील कंपनीच्या उपकरणामुळे परिसरातील घरांच्या भिंतींना अक्षरशः मोठमोठे तडे जाऊन ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

शिंदखेडा तालुक्यातील मौजे परसामळ गावातील रेल्वे स्टेशन कॉलनी परिसरात रहिवाशांची दिशाभूल करून वर्धमान कोटेक्स जिनिंग अँड प्रेसिंग कंपनी सुरु आहे. सदर ही कंपनी कॉलनी परिसरातून दहा मीटर अंतरावर असल्याने येथील नागरिकांना नाहक प्रकारचा त्रास सहन करावा लागत आहे. या कापूस कंपनी मुळे हार्ट फेल्युअर, फुफ्फुसाचा संसर्ग, गुदमरल्यासारखे वाटणे,श्वास घेण्यात अडथळा निर्माण होणे व डोकेदुखी सारख्या गंभीर समस्या समस्या उद्भवू लागल्या आहेत. कंपनीच्या मोठमोठ्या उपकरणाच्या ध्वनी कंपनामुळे येथील असणाऱ्या घरांना मोठ्या प्रमाणात तडे पडले आहे. यातून या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता या ठिकाणी नाकारता येत नाही. या कापूस जिनिंगमुळे अभालवृद्धांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. सदर ही कंपनी औद्योगिक क्षेत्रात असायला हवी होती. मात्र वर्धमान कोटेक्स जिनिंग अँड प्रेसिंग कंपनीच्या मालकांनी कॉलनी परिसराच्या अगदी दहा मीटराच्या अंतरावर या कंपनीची उभारणी केली. सदर ही कंपनी सुरू करत असताना येथील नागरिकांना विश्वासात घेतले गेले नाही. तसेच कुठलेही सर्वेक्षण या ठिकाणी झाले नाही.नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून कुठल्याही परवानगी यांच्याकडे नाही. सदर हे कंपनी चालक नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळत असून यांना राजकीय पाठबळ असल्याही



येथील नागरिकांनी आरोप केला आहे. परसामळ येथील रहिवाशी प्रवीण मंगांसे यानी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत माहिती अधिकारा मार्फत माहिती मागितली असता सदर या कंपनीने माहिती न देण्याबाबत कळवले असल्याच अजब उत्तर पत्रांन्वये दिल आहे.त्यामुळे यां कंपनीने कुठल्याही शासन परवानगी घेतल्या नसून ही बेकायदेशीर सुरु असल्याचा गंभीर आरोप परसामळ येथील कॉलनीतील रहिवाशांनी केला आहे. सदर प्रशासनाने याबाबत त्वरित दखल न घेतल्यास येत्या काही दिवसात उपोषण करून कंपनीला टाळे ठोकू असा इशाराही यावेळी रहिवाशांनी दिला आहे.

# विभागीय शिबिरात रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथील विद्यार्थ्यांचा सहभाग



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी विवेकानंद केंद्र कन्याकुमारी द्वारे युवा नेतृत्व विकसन शिबिराचे आयोजन संपूर्ण देशभर करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील नागपूर विभागाअंतर्गत सुद्धा युवा नेतृत्व विकसन शिबिरात या अनुषंगाने विविध महाविद्यालयांमध्ये परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

त्यानंतर एक दिवसीय शिबिर आणि स्वाध्याय वर्ग च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंदांचे विचार , केंद्राची कार्यपद्धती सांगण्यात आले. या सर्व प्रक्रियेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधून काही विद्यार्थ्यांची निवड करत नागपूर विभागीय केंद्राद्वारे वर्धा येथील सालोड या गावी विवेकानंद केंद्र कन्याकुमारीचे विभागीय शिबिर पार पडले. या शिबिरामध्ये राम कृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथील दहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

छत्रपती शाहू महाराज संस्थेद्वारा संचालित , संस्थापक अध्यक्ष डॉ. मारोती वाघ आणि संचालिका सौ लता वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभाग प्रमुख तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी आणि प्रा. सुषमा वाडस्कर यांनी विवेकानंद केंद्र कन्याकुमारी द्वारा घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये संयोजकाची जबाबदारी पार पाडली. विभागीय शिबिरात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना योग, खेळ, गटचर्चा बौद्धिक सत्र व भजन संध्या या सगळ्यांच्या माध्यमातून योग्य ते संस्कार करत विवेकानंदांना अपेक्षित असा युवा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना सुद्धा या शिबिरातून मार्गदर्शन मिळाल्याचा अनुभव आला. यापुढे स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी आम्ही सुद्धा आपले योगदान देऊ आणि राष्ट्राच्या पुढील निर्माण कार्यामध्ये सुद्धा आम्ही एक आदर्श विद्यार्थी म्हणून काय देता येऊ शकेल याचा विचार करू असा विचार, असं मनोगत शिबिरातून आल्यानंतर विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.


# भाऊसाहेब मिस्तरी यांच्या रंधा या कादंबरीला 'मृत्युंजय साहित्य गौरव पुरस्कार' जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** येथील भाऊसाहेब मिस्तरी यांच्या रंधा या कादंबरीला 'मृत्युंजय साहित्य गौरव पुरस्कार' जाहिर झाला आहे.

मा. पुरुषोत्तम सदाफुले अध्यक्ष म.का. साहित्य परिषद पुणे यांनी नुकतेच भाऊसाहेब मिस्तरी यांना रंधा कादंबरीसाठी मृत्युंजय साहित्य गौरव पुरस्कारसाठी आपली निवड झाल्याचे पत्र दिले आहे. रंधा ही कादंबरी ग्रामीण वास्तव,तेथील बलूतेदारी, वतनदारी यांच्या औदार्याचा सुक्ष्म व संवेदन परिपाठ मांडते. रंधा ही भाऊसाहेब मिस्तरी लिखित कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद मॉडेल कॉलेज घनसांगवी, जि. जालना बी.ए ऑनर्स मराठी द्वितीय वर्ष सत्र चौथे सीबीसीएस पद्धतीनुसार जून 2023 पासून लागू करण्यात आली आहे. भाऊसाहेब मिस्तरी यांची रंधा ही कादंबरी बहुचर्चित आहे. या कादंबरीवर अनेक मान्यवरांनी अनेक वृत्तपत्रातून नियतकालिकातून लेखन केलेले आहे. यासोबतच रेडिओवर रंधा कादंबरीवर मान्यवरांनी लिहिलेल्या समीक्षांचे सलग 19 भागात प्रसारण करण्यात आले आहे. मराठवाडा साहित्य परिषदेने रंधा निर्मिती प्रक्रियेवर भाऊसाहेब मिस्तरी यांचे यापूर्वी व्याख्यान आयोजित केले होते. प्रा. डॉ. सर्जेराव जिगे अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांचे रंधा कादंबरी निवडी विषयकपत्रक भाऊसाहेब मिस्तरी यांना प्राप्त झाले आहे. साहित्य आणि सांस्कृतिक विभागातील अनेक मान्यवरांनी डॉ.भाऊसाहेब मिस्तरी यांचे अभिनंदन केले आहे आणि पुढील साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.




# ताडोबाच्या बफरझोनमध्ये पुन्हा एक वाघ मृतावस्थेत आढळला

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वनविभागाचे पथक ताडोबा वन क्षेत्रांतर्गत असलेल्या घंटाचौकी परिसरात गस्त करीत असताना त्यांना खासगी जागेत एक वाघ मृत अवस्थेत आढळून आला.

एका खासगी जागेत पूर्ण वाढ झालेल्या टी-५१ या वाघाचा मृतदेह आढळल्याने वनविभागामध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. ताडोबाच्या बफर क्षेत्रातील बोर्डा बिटातील घंटाचौकीजवळील या घटनेने वनविभागामध्ये खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, वाघाच्या संपूर्ण शरीरावर जखमा आढळल्या असून अति रक्तस्त्रावामुळे वाघाचा मृत्यू झाल्याचा अंदाज वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी वर्तविला आहे. शरीरावर जखमा आढळल्याने शिकारीचा संशयही बळावला आहे. शिवाय दोन वाघांच्या झुंजीतही हा मृत्यू झालेला असू शकतो अशीही शक्यता नाकारता येत नाही.



संबंधित घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी मृतदेह ताब्यात घेत पाहणी केली. शवविच्छेदनानंतर वाघाचे दहन करण्यात आले. वाघाच्या मृत्यूचे नेमके कारण कळावे यासाठी वाघाचे काही अवयव प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. रिपोर्ट आल्यानंतरच वाघाच्या मृत्यूचे खरे कारण समोर येणार आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# धर्माबादमध्ये कॅरीबॅगचा पुरवठा सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** सरकारच्या नविन दुरुस्ती प्रमाणे 50-मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक कॅरीबॅग बंदीच्या निर्णयाचे समर्थन नागरिक आणि दुकानदार करत असले, तरी प्लास्टिक कॅरीबॅगचा सरस्पने वापर सुरू असल्याचे धर्माबाद शहरात दिसून आले, मात्र धर्माबाद शहरातील बहुतांश दुकानदाराकडे अजून ही कॅरीबॅग विक्री केली जाते, हे सरासपने निदर्शनात येत आहे.

धर्माबाद नगर परिषदचे अधिकारी वारंवार कारवाही करून सुद्धा यांचं परिणाम व्यापारांवर पडलेले दिसत नाही. सरकारी अधिकाऱ्यारी व्यापारांवर कठोर कारवाही करत नसल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे का धर्माबाद शहरातील परिस्थिती बिकट होत चालली का? कापड दुकानदार, तरकारी विकणारा, दूध विक्री करणारा, स्विट मार्ट वाले, किराणा दुकानदार, हॉटेल, मासे विक्री, मटण, चिकन विक्री, फळ विक्री करणारे, धाबेवाले, असे असंख्य



दुकानात निकृष्ट दर्जाचे सरास पणे कॅरीबॅग (प्लस्टिक विक्री केली जात आहे. विक्री सुरु असून त्याच्यावर अद्याप कारवाई झाली नाही. प्लास्टिक बंदी कायदा अंमलमध्ये येऊन जवळपास एक दीड वर्ष पूर्ण होत आहे. तरी कॅरीबॅग (प्लास्टिक) विक्री आणि वापरावर बंदी घालण्यात आले नाही? कॅरीबॅग सर्रास विक्री सुरूच आहे. प्लास्टिक पिशव्या पूर्ण बंद झाल्या तर तुम्ही ग्राहकांना काय द्याल? तर कागदी पिशव्या, कापडी पिशव्या, वृत्तपत्रांपासून बनविलेल्या पिशव्याचे वापर करावे.

प्लॅस्टिकबंदीबाबत काही सुजाण ग्राहकांकडून सातत्याने कापडी व कागदी पिशव्याची मागणी करण्यात येथे मात्र, आमच्याकडे कागदी व कापडी पिशव्या उपलब्ध नाहीत असे काही व्यापारी उडवा उडवीचे उत्तर देण्यात येते. व्यापाऱ्यांची मानसिकता बदलण्यासाठी सरकारी यंत्रणा कमी पडताना दिसत आहे.

> **पर्यावरणाला घातक असलेल्या प्लॅस्टिकबंदीला :** धर्माबादचे व्यापाऱ्यांनी कॅरीबॅग बंद करण्याला सकारात्मक प्रतिसाद दिला जात नाही. याला जबाबदार प्रशासन आहे. प्लास्टिक कॅरीबॅग बंदीनंतरही धर्माबाद शहरातील वेगवेगळ्या भागात सर्रास पणे होणारा प्लॅस्टिक कॅरीबॅगचा पुरवठा थांबविण्यात सरकारी यंत्रणेला अपयश आले आहे. धर्माबाद शहरात तात्काळ प्लास्टिक बंदी करा अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल.
> **गणेश गिरी, उपजिल्हाप्रमुख शिवसेना (ठाकरे गट)**



# मल्हारी मार्तंड देवास ऊबदार कपड्यांचा साज

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** संपूर्ण राज्यात सध्या थंडीची लाट उसळली असून मानवी जीवन गारठुन गेले आहे. अशातच अनेक लोक ऊबदार राहण्याचा प्रयत्न करत असतात तसे आपल्या देवाला ही ऊबदार पणा मिळावा म्हणून जेजुरी येथील खंडोबा देवाचे मानकरी आणि मल्हारराजे प्रतिष्ठान चे संचालक अध्यक्ष हरिदास आणि त्यांच्या पत्नी हर्षदा रत्नपारखी यांनी मल्हारी मार्तंड भैरव देवास ऊबदार वस्त्रांचा साज चढवीला आहे.

शुक्रवार प्रतिपदा दिनी खंडोबा देवाच्या गाभरा पाकळणी नंतर खंडोबा म्हाळसा देवी देवतांच्या ऐतिहासिक मूर्तिना तसेच साक्षात मार्तंड भैरव देवास ऊबदार, असे उलनचे कपडे घालण्यात आले तर खांद्यावर घोंगडी ही परिधान करण्यात आली असा सर्व ऊबदार साज खंडोबाला अर्पित करण्यात आला हर्षदा रत्नपारखी या स्वता मार्तंड विजय ग्रन्थनाचे पारायण करत असतात आपल्या कुलस्वामिस थंडी वाजू नये म्हणून त्यांनी स्वतः हाताने बाराबंदी, देवाची पगडी अशी वस्त्रे तयार केली यास चार महिन्याचा कालावधी लागला होता रत्नपारखी यांनी धार्मिक विधी करीत भंडाऱ्यांची उधळण करीत आपली देवाविषयाची ऊबदार भक्ती सेवा व्यक्त केली.

# नायलॉन मांजा ठरतोय जीवघेणा; चिमुकलीस पडले तेरा टाके

## मकर संक्रांतीच्या दिवशी नायलॉन मांज्याने गळा चिरल्याच्या अनेक घटना

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** मकर संक्रांतीच्या दिवशी नायलॉन मांज्याने गळा चिरल्याच्या अनेक घटना घडल्या असून यात एका 65 वर्षीय वृद्धाचा व सहा महिन्यांचे चिमुकलीचा समावेश आहे.

पुंडलिक भागाजी गायकवाड वय 65 रा वैजापूर असे वृद्धाचे तर ईयाना अशपाक शेख वय 6 महिने रा. खंडाळा, ता. वैजापूरअसे चिमुकलीचे नाव आहे. गायकवाड यांच्यावर शहरातील खाजगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी संभाजीनगर येथे हलवण्यात आले तर सहा महिन्याचे चिमुकलीवर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून तिला 13 टाके पडले आहेत



ही घटना शहरातील खान गल्ली इंगळे गल्ली परिसरात दुपारच्या सुमारास घडली असून नागरिक बेजबाबदार पणे नायलॉन चा मांज्याचा वापर करत असून यामुळे दुसऱ्यांना इजा होऊ शकते याकडे त्यांचं लक्ष नाही.

नायलॉन मांजा ने अपघाताच्या घटना सुरूच असून याआधीही गंगापूर रस्त्यावरील डीपी रोड परिसरात गलांडे या युवकाचा गळा चिरला होता व त्यानंतर दोन दिवसापूर्वीच शहरातील फेटा व्यावसायिक उमेश पोटे या तरुणाचा कान कापल्याची घटना या दोन्ही घटना ताज्या असताना यात आणखी या दोन घटनांची भर पडली आहे परिणामी सामान्य नागरिक पशुपक्षी यांच्यासाठी नायलॉन मांजा हा जीवघेणा ठरत असून प्रशासनाने नायलॉन मांजा बंदी तसेच विक्री करणाऱ्यावर कारवाई केली असून पण मांजा नागरिकांच्या हातात पडलाच आता अपयश कोणाचे सामान्य नागरिकात असामान्य चर्चा वैजापूरात बघावयास मिळत आहे. प्रशासनाने काळजी घेण्याचे आवाहन याप्रसंगी केले आहे.

# २२ जानेवारीला धुळ्यात होणार आचार्य विजय रत्नसुंदरसूरी यांचे प्रवचन



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** २२ ते २४ जानेवारी दरम्यान धुळ्यात प्रवचनाच्या माध्यमातून समाजाला संस्कार व संस्कृती जपण्याचा संदेश देणार असल्याची माहिती आचार्य विजय रत्नसुंदरसूरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. ५७ वर्षांपासून दीक्षा घेत संन्यस्थ जीवन जगणारे आचार्य विजय रत्नसुंदरसूरी म्हणाले की, भारतीय संस्कृती खूप श्रेष्ठ आहे, मात्र आभासी जगामुळे या संस्कृतीला धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत भारतीय संस्कृती जपण्याचा व त्यानुसार आपले आचरण करण्याचा प्रत्येकाने संकलप केल्यास सुखी व समाधानाचे वातावरण सगळीकडे निर्माण होईल. याकरिता युवापिढी संस्कारित होणे खूप महत्वाचे आहे. संतविचार समाजाला दिशा देत असतात. त्यामुळे संतांचा विचार समाजात पोहचवून तो रुजविण्याची आज नितांत गरज आहे. प्रवचन श्रवण केल्याने मन प्रसन्न होते. प्रफुल्लित होते. म्हणून प्रवचन ऐकले पाहिजे.

समाजाला प्रभावशाली बनवायचे असेल तर संत विचारधारेला महत्व द्यावे लागेल. शिक्षण, सत्ता, संत आणि माध्यमे या चार शक्ती समाजाला बदलू शकतात. यात माध्यमांचे सर्वात जास्त महत्व असून तितकीच महत्वाची जबाबदारी देखील माध्यमांची आहे. हम दो हमारे दो हा विचार स्वीकारताना आपल्याला आईवडिलांना बाजूला सारले गेले असल्याचा विचारही आपल्या मनात आला नाही. या हम दो हमारे दो मध्ये आमच्या आई वडिलांचे स्थान काय असा प्रश्नही आचार्य विजय रत्नसुंदरसूरी यांनी उपस्थित केला. केवळ गोवंशच नव्हे तर सर्व प्राणिमात्रांचे वंश वाचले पाहिजेत असं विचार मांडून आचार्य विजय रत्नसुंदरसूरी पुढे म्हणाले की, संतांची इच्छाशक्ती व शास्त्रांची क्रियाशक्ती एकत्र झाली तर एक चांगली आदर्श समाजव्यवस्था निर्माण होऊ शकते. यासाठी सुरक्षा व संस्कार जपण्याची हमी देणाऱ्या सरकारला आपण सत्तास्थान दिले पाहिजे. याकरिता दुर्जनांनी साजन होणे, सज्जनांनी संघटित होणे आणि संघटित सज्जनांनी सक्रिय होणे गरजेचे आहे असेही आचार्य विजय रत्नसुंदरसूरी यांनी नमूद केले.

# माँ जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांना १५२ जणांनी केले रक्तदानातून अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व क्रांतिसूर्य सावित्रीबाई फुले यांच्या जन्मोत्सवा निमित्त छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात 152 रक्तदात्यांनी रक्तदान करून अभिवादन करण्यात आले.

भारत देशाला दोन छत्रपती देणाऱ्या माँ साहेब जिजाऊ व सर्वसामान्य माणसाला शिक्षणाचे दार उघडे करून बहुजन समाजाला मुख्यप्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणाऱ्या क्रांतिसूर्य सावित्रीबाई फुले यांची जयंती सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत असते याचेच औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमास अध्यक्षा म्हणून जिजाऊ ब्रिगेडच्या तालुका अध्यक्षा रंजनाताई भोंबे या होत्या व उदघाटक म्हणून डॉ. रविकिरण चांडगे तर प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ सविता वाघमारे, डॉ. गीतांजली कान्हडकर, डॉ. दिपा परिहार, नमिता सोळंके, मिराताई देशमुख, आशाताई खिल्लारे, प्रियांका काजळे, श्रद्धा काकडे, स्वाती तोष्णीवाल, आम्रपाली अंभोरे, राजेश्री रोकडे, संगीता शिंदे यांची प्रमुख उपस्थितीती होती. यावेळी तब्बल 152 जणांनी रक्तदान करून अभिवादन केले कार्यक्रमासाठी छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काजळे,सचिव बालाजी शिंदे सोसकर यांच्यासह सोपान धापसे, शरद ठोंबरे, ऋषिकेश शिंदे, अनिल गाडेकर, अनिल दाभाडे, अभिजित देशमुख, संतोष शिंदे, रंजित मस्के, विजय पाटील, संजय काळे,दामू नवले, पिंटू रोकडे, सतिश ठोंबरे, संजय गायके, सुनील गाडेकर, विष्णू गाडेकर,उदय बांगर यांनी परिश्रम घेतले रक्ताचे संकलन परभणी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या ब्लड बँकेचे आत्माराम जटाळे, सचिन पवार, विनोद राठोड व कर्मचाऱ्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड माधव दाभाडे यांनी केले तर आभार सोपान धापसे यांनी मानले राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती असल्यामुळे मातृत्वाला प्राधान्य देत महिलांच्या हस्ते उदघाटन कार्यक्रम पार पडला विशेष म्हणजे यावेळी तब्बल 32 महिलांनी रक्तदान कडून अभिवादन केले.





# गंधेश्वर लघु प्रकल्पात अवकाळी पावसामुळे मोठा जलसाठा

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे गंधेश्वर येथील गंधेश्वर लघु प्रकल्पात डिसेंबर मध्ये झालेल्या आवकाळी पावसामुळे मोठा जलसाठा उपलब्ध झाल्याचे चित्र असुण शेतकऱ्यांसाठी सिंचन क्षेत्रासाठी मोठा फायदा होणार आहे. जलसाठ्यामुळे लगतच्या व लाभक्षेत्रात असलेल्या शेतकऱ्यांत आनंदी आनंद व्यक्त करण्यात येत आहे. गंधेश्वर लघु प्रकल्प पाटबंधारे गंधेश्वर सिंचन शाखा क्रमांक सात अंतर्गत असुण धरणाची लांबी १३०२मीटर तर या अंतर्गत सांडव्याची लांबी ३२२मीटर आहे.व लाभक्षेत्र ७२१हेक्टर, सिंचन क्षेत्र ४८७हेक्टर, लागवड क्षेत्र ६४९, कालव्याची लांबी सहा किलोमीटर आहे. वर्ष २०२३ जेमतेम पर्जन्यमान पावसाळा राहीला सरासरी ऐवढाही पाऊस झाला नाही. त्यामुळे नदी नाले ओढे तलाव विहिरींना पुरपाणी जलसाठा नव्हताच व धरणातही तुरळक जलसाठा होता तसा कोरडाच होता.परंतु  वर्ष -२०२३ मधे वेळेवर पावसाला सुरुवात झाली व पाऊस होवुन थांबलाही वेळेवरच. त्यामुळे पाऊस पाण्याला घेवून नागरिक शेतकऱ्यांत चिंता निर्माण झाली होती. डिसेंबर दरम्यान अवकाळी मुसळधार पावसाने सर्वत्र पाणीच पाणी केले नदी नाले ओढे तलाव विहिरी सर्वांना पुरपाणी व जलसाठा झाला व दरम्यान गंधेश्वर परिक्षेत्रात जोरदार अवकाळी मुसळधार ढगफुटी सारखे प्रकार घडल्याने मोठ्या प्रमाणात जलसाठा जमा झाला आहे. त्यामुळे गंधेश्वर लघु प्रकल्प पाटबंधारे विभाग अंतर्गत लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

# निरेत मोफत डोळे तपासणी शिबिर; समर्थ दृष्टी सोशल फाउंडेशनचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** 'असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी"असे म्हटले जात असते. त्यामुळे लोकांच्या डोळ्यांची काळजी घेण्यासाठी समाजातून सुद्धा डोळ्यासंदर्भात विविध शिबिरे आयोजित केली जात असतात.

विविध संस्थाकडून सामाजिक जाणीवेतून दृष्टी देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले जात असते. असेच कार्य निरा ता.पुरंदर येथे वाढदिवसाचे औचित्य साधून करण्यात आले. देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार आणि पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने समर्थ दृष्टी सोशल फाऊंडेशनच्या विशेष आयोजनातून निरा ता.पुरंदर येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर व अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी एकूण १७५ जणांनी डोळ्यांची तपासणी करून घेतली.शिवाय ५ जणांना मोती बिंदू शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले.डॉ.मनोहर डोळे मेडिकल फाऊंडेशन यांच्या सहकार्याने हे शिबीर पार पाडण्यात आले. हे शिबिर संपन्न होण्यासाठी समर्थ दृष्टी सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोनम मोरे, उपाध्यक्ष मंगल मोरे आणि राहुल मोरे, सचिन मोरे यांनी विशेष मेहनत घेतली. शिबिर उदघाटन प्रसंगी ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी संजय जगताप, पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती दत्ता आबा चव्हाण, सरपंच तेजश्रीताई काकडे, उपसरपंच राजेश काकडे, ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, प्रमोद काकडे, संदीप धायगुडे, अभिषेक भालेराव, ज्येष्ठ नेते कल्याण तात्या जेधे, चंद्रराव धायगुडे, विराज काकडे, हरिभाऊ जेधे,विक्रम दगडे, अमोल साबळे, सुभाष जेधे, संतोष मोहिते,अजित सोनवणे, संतोष जाधव, विक्रम पवार, श्रीकांत देव,काळे ताई, निगडे ताई, नंदूकाका शिंदे, विजय शिंदे,सिकंदर शेख, रफिक शेख, जावेद शेख, प्रमोद पवार, अनिकेत शिंदे, रमेश जेधे, अभिजित जगताप,गणेश फुलमाळी, रईस शेख, ओजेझ जैन, अभिषेक चव्हाण, विक्रम पवार यांच्या सह इतर उपस्थित होते. डॉ. अंगद आपेट, डॉ. विजय गायकवाड, डॉ.सुरेश पंडित आदी डॉक्टरांनी नेत्र तपासणीचे कार्य पार पाडले.यावेळ उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत असताना या महत्वपूर्ण उपक्रमाचे विशेष कौतुक केले. सामाजिक बांधिलकी जपत समर्थ दृष्टी सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून नेहमी विविध उपक्रम हाती घेतले जात असतात.

शैक्षणिक कार्य सुध्दा घेण्याचा कृतीशील प्रयत्न हा समर्थ दृष्टी सोशल फाऊंडेशनकडून केला जात असतो.यावेळी अनेक उपक्रमाबद्दल समर्थ दृष्टी सोशल फाऊंडेशनचे कौतूक करण्यात आले.अशा उपक्रमांची गरज असून असे उपक्रम वारंवार समाजात घेतले पाहिजेत.असे मान्यवरांनी म्हटले.तसेच येणाऱ्या काळात शैक्षणिक आणि आरोग्याच्या दृष्टीने समर्थ दृष्टी सोशल फाऊंडेशन सदैव काम करत राहणार आहे, असे सुद्धा राहुल मोरे यांनी सांगितले.




गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर